# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक १६ जुलै, २०१८ / आषाढ २५, १९४० (शके)**

| | |
|---|---|
| (१) शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, उच्च व तंत्रशिक्षण, मराठी भाषा, सांस्कृतिक कार्य, अल्पसंख्यांक विकास व वक्फ मंत्री<br>(२) अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण, अन्न व औषध प्रशासन, संसदीय कार्य मंत्री<br>(३) पर्यावरण मंत्री<br>(४) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ७७**

---

### शिक्षण हक्क कायद्यांतर्गत राखीव प्रवेश खाजगी शिक्षण संस्थांनी नाकारल्याबाबत

**(१) * ४२०६९ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती स्मिता वाघ, श्री.रामनिवास सिंह, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंदराव पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीई) राज्यातील खाजगी शाळांमध्ये गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना २५ टक्के राखीव प्रवेश असताना पालिका शिक्षण विभाग आणि उपसंचालक कार्यालयाच्या अखत्यारितील ९१ शाळांनी १८३२ जागा असताना ५७१ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास नकार दिल्याचे दिनांक १६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरटीई अंतर्गत प्रवेश नाकारणाऱ्या शाळांवर प्रशासक नेमण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतल्याचे माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच या जागांवर प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क शासनाकडून शाळांना देण्यात येते मात्र काही वर्षापासून शाळांना शासनाकडून शुल्काचा परतावा मिळाला नसल्याने शाळांनी आरटीई मधून प्रवेश दिला नसल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरटीई प्रवेश प्रक्रियेतील एखाद्या मुलाला प्रवेश मिळाला नाहीतर त्यास संबंधित शिक्षणाधिकारी जबाबदार राहणार असून ज्या शाळांनी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला नाही त्या शाळांची नावे काय आहेत, तसेच सदर विद्यार्थ्यांचे शुल्क प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत, आतापर्यंत राज्यातील किती आरटीई अंतर्गत प्रवेश नाकारणाऱ्या खाजगी शाळांवर कारवाई केली,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रलंबित शुल्काचा परतावा भरुन गरीब व मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळांमध्ये प्रवेश मिळण्याकरीता कार्यवाही करुन ज्या ९१ शाळांनी ५७१ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला नाही त्या शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच केलेल्या कारवाईचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) व (४) आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश नाकारलेल्या शाळांची तक्रार प्राप्त झाल्यानंतर सदर शाळांना नोटीस देवून विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे आदेश देण्यात येतात. त्यानंतरही प्रवेश न दिल्यास सदर शाळांवर शासन निर्णयातील तरतूदीनुसार कारवाई करण्यात येते. आर.टी.ई. अंतर्गत प्रवेश

नाकारलेल्या शाळांची नावे (१) संत रामानंद इंग्लिश मिडीयम स्कूल, प्लॉट नं. ८४, जिजामाता हॉस्पिटल जवळ, जयहिंद हायस्कूल समोर, पिंपरी, पुणे-१७ व (२) श्री स्वामी समर्थ इंग्लिश मिडीयम स्कूल, सेक्टर-२, इंद्रायणी, नगर, भोसरी, आकुर्डी, पुणे-२६.

उपरोक्त दोन्ही शाळांना नोटीस देण्यात आली आहे. तसेच सन २०१६-१७ पर्यंत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती दायित्वाची रक्कम क्षेत्रिय यंत्रणेला अदा केली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्‌यालयाचा कायम शब्द काढण्याबाबत

**(२) * ४२६३४ श्री.प्रकाश गजभिये, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३८१७३ ला दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्‌यालयाचा कायम शब्द काढून अनुदान देण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही करण्यात आली आहे काय, तसेच राज्यात सन २००१ पूर्वी कायम अनुदानित तत्वावरील महाविद्‌यालयांना शासनाने मंजूरी दिली असल्यास मंजूरी देणे केव्हा सुरु झाले,

(२) तसेच, सन २००१ नंतर महाविद्‌यालयांना अनुदान देणे बंद झाले असल्यास सन २००१ पूर्वी मान्यता दिलेल्या वरिष्ठ महाविद्‌यालयांची संख्या किती व त्यांना अनुदान देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त महाविद्‌यालयांना सन २०१८-१९ मध्ये शैक्षणिक वर्षापासून अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही. तथापि, सन २००१ पूर्वीच्या काही कायम विनाअनुदानित तत्वावरील विधी शाखेच्या महाविद्यालयास १९९५-९६ तर पारंपारिक महाविद्यालयांना १९९७-९८ पासून कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) राज्यामध्ये सन २००१ पूर्वी कायम विनाअनुदानित तत्वावर मान्यता दिलेल्या महाविद्यालयांची संख्या ६३ असून सदर महाविद्यालयांना अनुदान देण्याची बाब शासनाच्या तूर्त विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांची भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत

**(३) * ४१६९८ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वेतनावरील खर्च नियंत्रित करण्याकरीता वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांच्या भरती प्रक्रियेला दिनांक २५ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास बंदी घालण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरती प्रक्रिया बंद असल्याने हजारो रिक्त जागांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून सदर भरती प्रक्रियेवरील बंदी उठविण्यासाठी तासिका तत्वावर कार्यरत असणाऱ्या अनेक शिक्षकांनी शासनाच्या विरोधात आंदोलने केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर भरती प्रक्रियेवरील बंदी उठविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.

(२) अंशतः खरे आहे.

अधिव्याख्यात्यांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शैक्षणिक काम पूर्ण करण्यासाठी तासिका तत्वावरील अभ्यागत अधिव्याख्याता नियुक्तीची तरतुद आहे. त्यानुसार तासिका तत्वावर अधिव्याख्याता नियुक्ती करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची काळजी घेण्यात येते.

(३) व (४) वित्त विभागाच्या प्रचलित धोरणानुसार पदांच्या आढाव्यास/ आकृतिबंधास अंतिम मंजूरी मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

प्राचार्याची रिक्त पदे भरण्याबाबतचे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने दिनांक २३/४/२०१८ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत.

-----------------

## तारापूर, बोईसर (जि.पालघर) येथील कंपन्यांमधील रासायनिक सांडपाण्यामुळे खाड्या प्रदूषित होत असल्याबाबत

**(४) * ४१८९८ श्री.आनंद ठाकूर, श्री.प्रसाद लाड, श्री.जयंत पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथील तारापूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील सामुदायिक सांडपाणी प्रक्रिया केंद्र हे सन २००८ मध्ये उभारले असून शासकीय अनास्थेमुळे प्रकल्पाची उभारणी प्रलंबित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले तसेच सदर केंद्राची क्षमता २५ दशलक्ष लीटर प्रतिदिन इतकी असताना उद्योगांकडून त्यापेक्षा जास्त पाण्याची आवक होते, तसेच सांडपाणी प्रक्रियेस होत असलेल्या विलंबाचा परिणाम किनारपट्टीवरील गावांना व मच्छीमारांना होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तारापूर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील अतिरिक्त रासायनिक सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेशिवाय नवापूर येथील समुद्रात तसेच सरावली खाडीत सोडण्यात येत असल्याने प्रदूषित सांडपाण्यामुळे नवापुर, दांडी, उच्छेळी व मुरबे भागातील समुद्राचे पाणी तसेच परिसरातील सर्व खाड्या प्रदूषित होवून मासे मृत पावल्याचे दिनांक १० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून प्रदूषित पाण्यामुळे अनेक ठिकाणी गावातील बोअरवेलला दुर्गंधीयुक्त पाणी येत असून विनाशकारी केमिकलमुळे परिसरातील शेकडो खारफुटीही करपली गेल्याचे माहे एप्रिल-मे, २०१८ या दोन महिन्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कंपन्यांच्या प्रदूषित सांडपाण्यामुळे नवापूर खाडीतील मासे मृत्यूमुखी पडल्याने पारंपारिक मासेमारी करणाऱ्यांवर संकट आले असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आल्याने त्यांनी तारापूर औद्योगिक परिसरात सीईटीपी आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयामध्ये ३० ते ४० किलो मृत मासे गोळा करुन टेबलांवर व इतरत्र टाकून आपला संताप व्यक्त केला होता, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर खाड्या प्रदुषणमुक्त करण्यासाठी कार्यवाही करुन याप्रकरणात दोषी असलेल्या कंपन्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत खरे आहे.

(३) हे खरे आहे.

दिनांक ०९/०४/२०१८ रोजी नवापूर खाडी लगत बाई जातीचे मासे मृत पावल्याची घटना घडली होती. नवापूर गावातील गावकरी ग्रामपंचातीच्या वाहनाने आणून ते मासे उपप्रादेशिक कार्यालय व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तारापूर या कार्यालयात टाकले होते.

(४) मा.जिल्हाधिकारी, पालघर यांनी दिनांक ०९/०४/२०१८ रोजी नवापूर येथे घडलेल्या मासे मर्तुकीची गंभीर दखल घेऊन दिनांक १३/०४/२०१८ रोजी विशेष समिती गठित करण्यात आली आहे.

तसेच, दोषी आढळलेल्या एकूण ०८ उद्योगांना उत्पादन बंदचे आदेश देण्यात आले असून सदर पैकी ०३ उद्योगांनी सादर केलेल्या प्रदूषण नियंत्रणाबाबतच्या उपाययोजना व प्रतिज्ञापत्राच्या आधारे काही अटी व शर्तीस अनुसरून उत्पादन पुन:श्च सुरू करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या अनागोंदी कारभाराबाबत

**(५) * ४२१८९ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विदयापीठाचे ३० परिक्षांचे वेळापत्रक पुढे ढकलण्यात आल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाणिज्य, व्यवस्थापन व कला शाखेच्या अनेक परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या असून अनेक परीक्षांची निकाल प्रतिक्षा कायम असल्यामुळे विदयार्थ्यांचे प्रत्येक वर्षी शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय हे खरे आहे.

(२) वाणिज्य, व्यवस्थापन व कला शाखांचे सन २०१७-१८ सालचे अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयातील प्रवेश अनेक महाविद्यालयात विलंबाने झाले. ९० दिवसाचा शिकवणी वर्ग पूर्ण न झाल्यामुळे अनेक परीक्षा नियोजित वेळेवर होऊ शकल्या नाहीत. तसेच व्दितीय सत्र २०१८ च्या अनेक परिक्षांचे निकाल वेळेवर जाहिर झाले नाहीत व निकाल जाहिर झाल्यानंतर पुढील परीक्षा अर्ज भरण्यासाठी व अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना पुन:परीक्षेसाठी वेळ मिळावा म्हणून काही परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. तसेच विधी व कंपनी सेक्रेटरीच्या परीक्षा एकाचवेळी आल्याने विद्यार्थ्यांना दोन्ही परीक्षा देता याव्यात म्हणून विधीच्या परीक्षा पुढे कराव्या लागल्या.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शालेय पोषण आहार शिजविण्याची व वितरणाची व्यवस्था स्वतंत्र यंत्रणेमार्फत करण्याबाबत

**(६) * ४२३९३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय पोषण आहार शिजविण्याची व वाटपाच्या व्यवस्थेची जबाबदारी मुख्याध्यापक व शिक्षकांकडे सोपविण्यात आली त्यासाठी शासनातर्फे धान्य व इतर पदार्थांचा पुरवठा शाळेला वेळेवर मिळत नसून शासनाकडून नेहमीच विलंब होत असून शालेय पोषण आहार नेहमीच सुरु रहावा असा शासनाने आदेश निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धान्य पुरवठा शासनाकडुन विलंबाने होत असल्याने व शालेय पोषण आहार बंद करु नये यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते व काही वेळेस स्वत:चे पैसे खर्च करावे लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनाला अनेकवेळा निवेदने देवून शालेय व्यवस्थापनाकडून शालेय पोषण आहार वितरणाची जबाबदारी काढुन घेण्याची व शालेय पोषण आहार शिजवून वितरण करण्याची व्यवस्था स्वतंत्र यंत्रणेमार्फत करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शालेय पोषण आहार शिजविण्याची व वितरणाची व्यवस्था स्वतंत्र यंत्रणेमार्फत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे आहे.

(४) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत शाळास्तरावर अन्न शिजविण्याची आणि आहार वितरणाची जबाबदारी आहार शिजविणाऱ्या बचतगटाची असून याबाबतचे सनियंत्रणाचे काम मुख्याध्यापकावर सोपविण्यात आलेले आहे. याविरोधात काही शिक्षक संघटनांनी केलेल्या न्यायालयीन प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने शासनाची बाजू ग्राह्य धरलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) * ४१४३० श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये मे, २०१२ नंतर शिक्षकांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये व विद्यार्थ्यांना शिक्षक दयावेत या पालकांच्या मागणीमुळे शाळा व्यवस्थापनांनी नियमानुसार व आरक्षणानुसार नियुक्ती केलेल्या शेकडो

शिक्षकांना वेळोवेळी मागणी करुनही शिक्षणाधिकाऱ्यांनी मान्यता न दिल्याने शिक्षकांना विनावेतन काम करावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांच्या हितासाठी नियमाप्रमाणे नियुक्ती केलेल्या शिक्षकांना मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) शिक्षक पदावरील नियुक्तीबाबत दिनांक २ मे, २०१२ च्या शासन निर्णयान्वये घालण्यात आलेल्या निर्बंधातील अटी शासन निर्णय, दिनांक ०६ सप्टेंबर, २०१२, दिनांक ०६ मे, २०१३ तसेच वेळोवेळीच्या आदेशान्वये शिथील करण्यात आलेल्या आहेत तसेच इंग्रजी, गणित व विज्ञान विषयक पदे भरण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. काही शिक्षकांच्या नियुक्त्या नियमाप्रमाणे केल्या नसल्याचे प्राथमिक चौकशीत आढळून आल्यामुळे वरिष्ठ स्तरावरुन तपासणी करण्यात येत आहे. अल्पसंख्याक/अल्पभाषिक शाळांमधील पदांच्या मान्यतेबाबत शासन निर्णय दिनांक १३ जुलै, २०१६ व दिनांक २७ ऑक्टोबर, २०१६ अन्वये कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्याच्या पश्चिम भागातील आंधळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत

**(८) * ४१९७१ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्याच्या पश्चिम भागातील गावांसाठी सुरु केलेली आंधळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे आणि निकृष्ट कामामुळे पूर्ण क्षमतेने न वापरताच निरुपयोगी झाल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे परिसरातील नागरीकांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत असून पिण्याच्या पाण्यासाठी टँकरही उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्याच्या पश्चिम भागातील आंधळगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे खरे नाही.

(२) नाही.

चालू टंचाई कालावधीत कोणत्याही टंचाई उपाययोजनांची मागणी केली नाही.

(३) जून, २०१८ अखेर एकाही गावाची पाणी मागणी नसल्याने योजना बंद आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संयुक्त जबाबदारी घेऊन योजना कार्यान्वित करुन जिल्हा परिषदेकडे हस्तांतरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात गुटखा बंदी असताना गुटख्याची विक्री होत असल्याबाबत

**(९) * ४१४९० श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बांदा पोलिसांच्या हद्दीत निगुडे-मधलीवाडी येथे स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाने दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास केलेल्या कारवाईत अवैध गुटखा जप्त करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परराज्यातून गुटख्याची वाहतुक मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे राज्यात गुटखाबंदीची कठोर अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत असलेली भ्रष्ट साखळी शोधून काढण्यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परराज्यातून येणारा गुटखा, गुटख्याची वाहतुक, राज्यात करण्यात येत असलेला गुटख्याचा साठा आणि त्याची राजरोसपणे होणारी अवैध विक्री याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

(२) होय, प्राप्त तक्रारीबाबत चौकशी सुरु आहे.

(३) राज्यात गुटख्याची वाहतुक व विक्री राजरोसपणे किंवा सहजपणे होत नसून चोरट्या व छुप्या मार्गाने होते असे प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीवरुन आढळून आले आहे.

अन्न व औषध प्रशासनाने संपूर्ण राज्यात सन २०१७-१८ मध्ये ४६३५ अन्न आस्थापनांची तपासणी करुन १३९६ पेढ्यांवर प्रतिबंधित अन्नपदार्थांबाबत कारवाई करुन एकूण रुपये ३९,८४,००,७६५/- किंमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. प्रतिबंधित अन्न पदार्थांवर आळा बसविण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाकडून वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहर गुटखामुक्त करण्याबाबत

**(१०) * ४२०२४ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मागील ५ वर्षापूर्वी गुटखा बंदी झाली असली तरी पुण्यामध्ये गुटख्याच्या माध्यमातून व पोलीस यंत्रणेच्या सहकार्याने दरमहा ५०० कोटींचा गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुजरातमधून चाकण, कोंढवा आणि कात्रपमधील भांगडेवाडीत ट्रकद्वारे गुटख्याची आयात होऊन तो पुणे शहरातील किरकोळ विक्रेत्यांकडे तसेच फेरीवाल्यांच्या माध्यमातून पानपट्टी दुकानदारापर्यंत पोहचविला जातो, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार विद्येचे माहेरघर असलेल्या पुणे शहराला गुटखामुक्त करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही. अशी बाब अन्न व औषध प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही. मात्र दिनांक २१/०४/२०१८ रोजी वृत्तपत्रात अशा आशयाची बातमी प्रसिध्द झाली होती.
(२) व (३) अन्न व औषध प्रशासन व पोलिसांनी एकत्रित कार्यवाही करुन एका प्रकरणी गुजरातमधील अहमदाबाद येथून चाकण येथे एकूण ४ ट्रकद्वारे विक्रीकरीता आणलेला रुपये २ कोटी ३२ लाख ८० हजार किंमतीचा पान मसाला व सुंगधित तंबाखुचा साठा वाहतुकीसाठी आणलेल्या ४ ट्रकसह दिनांक १६/०३/२०१८ रोजी जप्त करण्यात आला आहे. सदर प्रकरणी तपास पूर्ण करुन न्यायालयात खटला दाखल करण्याची कारवाई करण्यात येत आहे.

पुणे शहराला गुटखा मुक्त करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनामार्फत विशेष मोहिम राबवून गुटखा व प्रतिबंधित पदार्थ विक्री करणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लातूर व जालना येथे नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(११) * ४१७७५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ४०७५९ ला दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर व जालना येथील शासकिय तंत्रनिकेतन बंद करुन तेथे अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्यासाठी शासनाने दोन वर्षापुर्वी निर्णय घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तंत्रनिकेतन बंद केल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची गैरसोय न होण्यासाठी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधी यांच्या मागणीमुळे मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी लातूर येथील मुलींचे तंत्रनिकेतन सुरु ठेवुन नवीन अभियांत्रिकी पदवी महाविद्यालयाचा नवीन प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी सूचना केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन लातूर प्रमाणेच जालना येथील तंत्रनिकेतन सुरु ठेवून नवीन अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

शासन निर्णय दिनांक १३/१०/२०१६ अन्वये राज्यातील शासकीय तंत्रनिकेतन, रत्नागिरी, यवतमाळ, धुळे, जालना, सोलापूर व पुरणमल लाहोटी तंत्रनिकेतन, लातूर या सहा तंत्रनिकेतनांचे पदवी अभ्यासक्रमांमध्ये श्रेणीवर्धन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(२) नाही. मात्र, लातूर येथील शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन सद्य:स्थितीत पुर्ववत सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच लातूर येथील पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, या संस्थेचे अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये रुपांतरण करण्यासही स्थगिती देण्यात आली आहे.

(३) जालना येथे शासकीय तंत्रनिकेतन आहे तसेच सद्य:स्थितीत सुरु ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या तंत्रनिकेतनाचे श्रेणीवर्धन करुन अभियांत्रिकी महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय शासनाने स्थगित केला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वालधुनी नदीच्या पात्रात रासायनिक सांडपाणी सोडणाऱ्या व कॉँक्रीटचे बांधकाम करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१२) * ४१३०२ श्री.रविंद्र फाटक, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर आणि अंबरनाथ या दोन शहरांच्या सीमारेषेवरील वडोळ गावाजवळून वाहणाऱ्या तसेच मलंगगड परिसरातून उगम पावून कल्याण खाडीला मिळणाऱ्या वालधुनी नदीच्या पात्रात घातक रसायने सोडल्याने प्रदूषित सांडपाण्यामुळे वालधुनी नदीस गटाराची प्रतिमा प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच अंबरनाथ औद्यागिक वसाहतीतील काही नवीन कंपन्यांनी नदीच्या पात्रात मातीचा भराव टाकून औद्योगिकीकरणाने नदीपात्रात क्रॉँक्रीटची भिंत उभारली असून दोन्ही बाजूला मोठे खांब उभारून मध्ये लोखंडी जाळी टाकल्याचे निदर्शनास आले असून यासंदर्भात उल्हासनगरच्या हिराली फाऊंडेशनने मा.मुख्यमंत्र्यांकडे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, औद्योगिक विभागातील रासायनिक तसेच नागरी वस्तीतील सांडपाणी योग्य ती प्रक्रिया न करता सातत्याने नदीपात्रात सोडल्याने वालधुनीची अवस्था अतिशय दयनीय झाली असून नदीपात्रात होणारे कॉँक्रीटचे बांधकाम तसेच घातक रसायने यामुळे नदी प्रदूषित होवून परिसरात दुर्गंधी पसरली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आंतरराष्ट्रीय किर्तीचे जलतज्ञ राजेंद्र सिंह यांनी मागील २ वर्षात अनेकवेळा वालधुनी परिसराला भेट दिल्यानंतर वालधुनी नदीपात्रात प्रदूषित सांडपाणी सोडणे बंद केलेतर वालधुनीला संजीवनी मिळू शकेल असा विश्वास व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वालधुनी नदी प्रदूषणमुक्त करण्याबाबत कार्यवाही करुन नदीत दूषित पाणी सोडणाऱ्या व कॉँक्रीटचे बांधकाम करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अशा प्रकारचे निवेदन प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) अंशत: खरे आहे.

(४) खरे आहे.

(५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योगांना वेळोवेळी भेटी देऊन संमतीपत्रातील अटी व शर्तीची तपासणी केली जाते. तसेच प्रक्रियाकृत सांडपाण्याचे नमुने संकलित करण्यात येतात. सदर भेटी दरम्यान संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास दोषी उद्योगांना प्रस्तावित निर्देश, अंतरिम आदेश अथवा बंदचे आदेश बजावण्यात येतात.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजस्थानमधील इयत्ता आठवीच्या पाठयपुस्तकामध्ये लोकमान्य टिळकांचा दहशतवादी असा अवमान केल्याबाबत

**(१३) * ४१६७१ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे महापुरुष लोकमान्य टिळक यांचा उल्लेख दहशतवादी असा राजस्थान राज्यातील इयत्ता ८ वीच्या पुस्तकामध्ये करुन या राज्याचाच नव्हे तर देशाचा अवमान केल्याची घटना माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान राज्य शासनाच्या निदर्शनास आली आहे काय किंवा आणून देण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, महान थोर महापुरुषाचा दहशतवादी म्हणून उल्लेख केल्याप्रकरणी सदर पाठ्यपुस्तक मागे घेण्याबाबत मा.राजस्थान शासनाकडे राज्य शासनस्तरावरुन कार्यवाही करावी अशा स्वरुपाची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ मे, २०१८ रोजीच्या पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींनी मागणी केल्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) वर्तमान पत्रातील बातमीवरून समजले.
(२) या विभागाकडे निवेदन प्राप्त झालेले नाही.
(३) या प्रकरणी राजस्थान सरकारच्या राज्य शैक्षणिक अनुसंधान व प्रशिक्षण संस्था उदयपूर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार असा उल्लेख नसल्याचे स्पष्ट केले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात शौचालये बांधण्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(१४) * ४२४७० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ३६ जिल्हे हागणदारीमुक्त झाल्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे एप्रिल, २०१८ मध्ये जाहीर केलेले असतानाही आजमितीस राज्यात १ लाख १० हजाराहून अधिक शौचालये बांधण्याचे काम प्रलंबित असल्याचे मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री महोदयांनी दिनांक ३ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास जाहीर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात शौचालये बांधण्याचे काम प्रलंबित असताना राज्य हागणदारीमुक्त झाल्याचे मा.मुख्यमंत्री महोदयांनी कोणत्या आधारावर जाहीर केले,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उर्वरित १ लाख १० हजार शौचालये उभारण्याचे काम पूर्ण होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

राज्यात सन २०१२ मध्ये करण्यात आलेल्या पायाभूत सर्वेक्षणात ज्या कुटूंबांकडे शौचालय सुविधा उपलब्ध नव्हती अशा कुटूंबांना वैयक्तिक तसेच ज्या ठिकाणी वैयक्तिक शौचालय देणे शक्य नव्हती, अशा ठिकाणी सामुहिक तसेच सार्वजनिक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. अशा प्रकारे पायाभूत सर्वेक्षणानुसार स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत ३४ जिल्ह्यामध्ये (राज्याच्या ३६ जिल्ह्यापैकी मुंबई व मुंबई उपनगर वगळून) ग्रामीण भागात सर्व कुटूंबांना शौचालय सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत दिनांक १८ एप्रिल, २०१८ रोजी राज्य हागणदारीमुक्त घोषित करण्यात आलेले आहे.

(३) ज्या कुटूंबांनी वैयक्तिक शौचालय अजून बांधली नाही त्या कुटूंबांना वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी प्रवृत्त करण्याचे काम सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावनेर (जि.नागपूर) येथील कै.राम गणेश गडकरी यांचे निवासस्थान व समाधीस्थळाचे जतन करण्याबाबत

**(१५) * ४१२९३ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) येथील कै.राम गणेश गडकरी यांचे निवासस्थान, समाधीस्थळ व नाट्यगृहाकडे कायम दुर्लक्ष झाल्याने ते भग्नावस्थेत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्मृतीस्थळे भग्नावस्थेत असल्याने तेथील साहित्यांची चोरी झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर स्मृतीस्थळांचे जतन करण्याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

सावनेर (जि.नागपूर) येथील कै.राम गणेश गडकरी यांचे निवासस्थान राज्य संरक्षित स्मारक आहे. सदर स्मारकाची परिस्थिती उत्तम आहे.

कै.राम गणेश गडकरी यांचे समाधीस्थान व नाट्यगृह हे या विभागाचे राज्य संरक्षित स्मारक नाही.

(२) हे खरे नाही.

(३) कै.राम गणेश गडकरी यांचे सावनेर (जि.नागपूर) येथील स्मारक चांगल्या परिस्थितीत असून परिसर स्वच्छ व योग्य प्रकारे ठेवण्याकरीता कायम स्वरुपी पहारेकऱ्याची नेमणूक केलेली आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात स्मारक परिसराची देखभाल व बगीचा परिरक्षण करण्याकरीता रुपये ७४,७६५/- इतका निधी खर्च करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माणिकगड (ता.गडचांदूर, जि.चंद्रपूर) येथील सिमेंट उद्योगावर कारवाई करण्याबाबत

**(१६) * ४२५१४ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणिकगड (ता.गडचांदूर, जि.चंद्रपूर) येथील सिमेंट उद्योगामुळे परिसरात हवा प्रदूषित होवून नागरीकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार सदर उद्योगावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, गडचांदूर, जि.चंद्रपूर यांचेकडून दिनांक ०६/०६/२०१८ रोजीच्या प्राप्त पत्रान्वये गडचांदूर येथील

माणिकगड सिमेंट कंपनी व पॉवर प्लांटच्या वायु प्रदूषणामुळे गडचांदूर शहरातील नागरीकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये निदर्शनास आले असल्याचे कळविलेले आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून माणिकगड सिमेंट या उद्योगाची दिनांक २४/०१/२०१८ रोजी पाहणी करण्यात आली व पाहणीमध्ये आढळून आलेल्या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत दिनांक ०७/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदरील उद्योगास कळविण्यात आले होते. कारखान्याने दिनांक १२/०३/२०१८ च्या पत्रान्वये म.प्र.नि. मंडळाच्या पाहणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करीत असल्याचा अहवाल सादर केला होता. सदरील अहवाल समाधानकारक नसल्याने दिनांक २८/०३/२०१८ रोजी उद्योगास कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आलेली आहे व दिनांक ०३/०४/२०१८ रोजी पाहणी करून संमतीपत्राच्या अटी शर्तीनुसार कारखान्याने दिलेल्या रुपये ५.० लाखाची बँक हमी दिनांक २६/०४/२०१८ रोजी जप्त करून दुप्पटीने (रुपये १० लाख) बँक हमी घेण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह उपनगरातील अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * ४२१६६ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये शासनाची अथवा मुंबई महानगरपालिकेची परवानगी न घेता २३१ शाळा अनधिकृतपणे सुरु असून आजमितीस राज्यात १ हजार ९२ शाळा अनधिकृतपणे, पूर्व परवानगीशिवाय सुरु असल्याचे यु-डायस या संस्थेने सादर केलेल्या अहवालातून माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अहवालानुसार अशा अनधिकृत शाळांचे सर्वाधिक प्रमाण मुंबईसह उपनगरात असून, मुंबईत सुमारे २२२, पालघरमध्ये २०८ तर ठाण्यात १८५ अनधिकृत शाळा असल्याचेही निदर्शनास आले, तसेच उक्त २३१ शाळांमध्ये कोणकोणते वर्ग आहेत व त्यातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या किती आहे,

(३) तसेच प्रत्येक वर्षी मे महिन्यात राज्यातील अनधिकृत शाळांची यादी घोषित केली जात असून या शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये अशा सूचना देऊन या शाळांना केवळ सालाबादप्रमाणे नोटीस काढल्या जातात, मात्र माहिती असूनही या अनधिकृत शाळांवर कोणतीही कारवाई केली जात नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार अनधिकृत शाळा बंद केल्यास त्यामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांची पर्यायी व्यवस्था करण्याबाबत कार्यवाही करुन अनधिकृत शाळा व त्यांच्या चालक, संचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

मुंबई शहर व मुंबई उपनगरातील शांळामध्ये इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंत ४३,५४८ विद्यार्थी आहेत.

(३) व (४) अनधिकृत शाळांची यादी शिक्षणाधिकारी यांचेकडून जाहीर करण्यात येते. सदर शाळांमध्ये प्रवेश घेऊ नये असा फलक शाळेबाहेर लावण्यात आला असून सदर शाळांना नोटीस देण्यात आली आहे. त्यानुषंगाने खुलासा प्राप्त झाल्यावर योग्य ती कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे. अनधिकृत शाळा बंद करतांना त्यातील विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत समायोजन करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जेनेरिक औषधांकरीता असलेल्या नामसाधर्म्यांसाठीची बंधने ब्रँण्डेड कंपन्यांना लावण्याबाबत

**(१८) * ४२३०२ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.नागोराव गाणार, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत औषध ब्रँण्डच्या नावातील साधर्म्यांमुळे संभ्रम निर्माण होत असल्याने चुकीच्या औषधामुळे रुग्णांच्या आरोग्यास धोका निर्माण झाल्याचे औषध विक्रेत्यांनी व्यक्त केल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्न व औषध प्रशासनाने ब्रँण्डच्या नावावर बंधन नसून केवळ जेनेरिक औषधांच्या नावावर बंधने ठेवण्याची परवानगी असल्याचे स्पष्ट केल्याने नामसाधर्म्य औषधावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणाच अस्तित्वात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन जेनेरिक औषधांकरीता असलेल्या नामसाधर्म्यांसाठीची बंधने ब्रँण्डेड कंपन्यांवर करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९४० मधील नियमांतर्गत औषधाच्या ब्रँडनेमनुसार मंजूरी दिली जात नाही. त्यामुळे सदरहू बाब अन्न व औषध प्रशासनाच्या अखत्यारीत येत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोरेगांव (जि.सातारा) येथील आयनॉक्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीमधील कुलपतींवर कारवाई करण्याबाबत

**(१९) * ४१७०८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.रामराव वडकुते, श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगांव (जि.सातारा) येथे आयनॉक्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी नावाने ऑनलाईन बोगस विद्यापीठ स्थापन करुन वाजवी दरात कोणत्याही विषयातील पदवी तसेच पीएचडीपर्यंतची पदवी देण्याचा गैरव्यवहार करणाऱ्या डॉ. विठ्ठल श्रीरंग मदने या बनावट कुलपतीला पोलिसांनी अटक केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) उच्च शिक्षण संचालनालयाने दिनांक २५/०३/२०१८ च्या पत्रान्वये विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कोल्हापूर, विभाग कोल्हापूर यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते, त्यानुसार विभागीय सहसंचालक कोल्हापूर यांनी चौकशी केली असता सदर चौकशीमध्ये शासनाची कोणतीही परवानगी नसताना आयनॉक्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी कोरेगांव, जि.सातारा येथील सुभाषनगर परिसरातील १० x १० चौ. फुट खोलीतून आयनॉक्स इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी या नावे ऑनलाईन पध्दतीने

चालविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले, प्रकरणी डॉ.अभिषेक सुभाष हरिदास यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन श्री.विठ्ठल मदने विरुध्द कोरेगांव पोलीस स्टेशनमध्ये गुरनं. ७७/२०१८ भादंविसंक. ४२०, ३४ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील चौकशी सातारा पोलीस करत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठातील ऑनलाईन मुल्यांकन प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * ४१६७३ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रा.जोगेन्द्र कवाडे, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठातील ऑनलाईन मुल्यांकन प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(२) असल्यास, समितीला अहवाल सादर करण्यास दिनांक ३१ मे, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून सदर अहवालाचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच उक्त कालावधीतील काही अभ्यासक्रमांचे निकाल लावण्यात अनिश्चितता असल्याचे निदर्शनास आल्याने यासंदर्भात आढावा घेण्यात आला आहे काय, समितीचा अहवाल प्राप्त झाला नसल्यास किती कालावधीत अहवाल प्राप्त होण्याची शक्यता आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू समितीचा अहवाल प्राप्त होण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) याबाबतचा अहवाल अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) व (३) शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या त्रिसदस्यीय समितीला अहवाल सादर करण्यास दिनांक ३१ जुलै, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. तसेच उक्त कालावधीत मुंबई विद्यापीठातील काही अभ्यासक्रमांचे निकाल लावण्यात उशिर होत असला तरी बहुतांश निकाल विहीत कालावधीत लावण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

(४) लागु नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवपूरी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील तासगावकर अभियांत्रिकी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत

**(२१) * ४१३०८ श्री.हेमंत टकले, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८५९८ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवपूरी (ता.कर्जत, जि.रायगड) येथील तासगावकर अभियांत्रिकी महाविद्यालयातील अभियांत्रिकी पदवी, पदविका, फार्मसी पदवी व पदविका अशा विविध अभ्यासक्रमाच्या ९ महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी यांना १७ महिन्यांचे वेतन देण्यात आले नसून त्यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कमही वेळेवर भरण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अध्यापकांनी वेतनासंदर्भात मा.मुख्यमंत्री, मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, ए.आय.सी.टी.ई.चे अध्यक्ष, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन आदींकडे मागील एक वर्षापासून निवेदनाद्वारे शासनाचे लक्ष वेधले

असून ए.आय.सी.टी.ई. ने दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी आपला अहवाल राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनालयास सादर केला सदरहू अहवालात वेळेवर वेतन मिळत नसल्याचे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित प्राध्यापक व कर्मचाऱ्यांवर विनावेतनामुळे उपासमार होत असून दैनंदिन गरजा भागविण्यासाठी उच्च विद्याविभूषित असून देखील किरकोळ स्वरुपाची कामे करुन आपला उदरनिर्वाह करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे थकित वेतन देण्याच्यादृष्टीने कार्यवाही करुन सदरहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राध्यापकांना वेळेवर वेतन न देणाऱ्या संस्थाचालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) होय.

अध्यापकांच्या वेतनासंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांच्यास्तरावरील चौकशी समितीच्या अहवालानुसार संस्थेने अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले. त्यास अनुलक्षून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस सदर संस्थेविरूध्द कारवाई करण्याची विनंती करण्यात आली असता, दिनांक ०५ मार्च, २०१८ च्या पत्रान्वये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेकडून संस्थेस कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(३) याबाबत कोणताही अभिलेख आढळून येत नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई यांच्यास्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या तपासणी अहवालानुसार खालील बाबी प्रामुख्याने निदर्शनास आल्या.

१) शिक्षक/शिक्षकीय कर्मचाऱ्यांचे वेतन सुमारे १२ ते १७ महिन्यांपासून प्रलंबित आहे.

२) सन २०१३-१४ या वर्षात ओव्हरड्राफ्टने देण्यात आलेल्या दोन महिन्यांच्या वेतनाचे व्याज संबंधितांकडून घेण्यात आले.

३) सहाव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही.

४) तीन वर्षांपासून शिक्षकांना फॉर्म-१६ देण्यात आलेला नाही.

५) सन २०१३ पासून वेतनवाढ देण्यात आलेली नाही.

६) विहित मानकांनुसार शिक्षक-विद्यार्थी प्रमाण दिसून येत नाही.

वरील वित्तीय व प्रशासकीय अनियमिततांमुळे, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेव्दारे शैक्षणिक वर्ष सन २०१८-१९ करीता प्रसिध्द करण्यात आलेल्या Approval Process Handbook नुसार विहित केलेल्या वेतनविषयक निकषांचे उल्लंघन झाल्याचे आढळून आले.

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांविरूध्द कारवाई करण्याचा अधिकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर संस्थेस असल्याने सरस्वती एज्युकेशन सोसायटी, कर्जत या संस्थेंतर्गत असलेल्या व्यावसायिक महाविद्यालयांविरुध्द कारवाई करण्याबाबत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस विनंती करण्यात आली. त्यानुसार सद्य:स्थितीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सरस्वती एज्युकेशन सोसायटीच्या संबंधित संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता EOA दिलेले नाही व संबंधित संस्थांचा समावेश No Admission Category मध्ये करण्यात आला आहे. तसेच केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेमध्ये संबंधित महाविद्यालयाचा समावेश करण्यात आलेला नाही. त्यामुळे सदरील संस्थांमध्ये प्रवेश करण्यात आले नाहीत.

-----------------

## राज्यातील माध्यमिक शाळांच्या शिक्षकांचे समायोजन करण्याबाबत

**(२२) * ४२२८५ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८४१२ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील माध्यमिक शाळांच्या संचमान्यतेनुसार शिक्षकांचे समायोजन झाले नसल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांचे समायोजन पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) जिल्हास्तरावर समायोजन न झालेल्या शिक्षकांचे समायोजन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेतील रिक्त पदावर करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दादर (मुंबई) येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या अनागोंदी कारभाराची चौकशी करण्याबाबत

**(२३) * ४१४७६ ॲड.अनिल परब, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर (मुंबई) येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या मुंबईतील विविध भागात ७० शाळा असून या शाळांमध्ये प्रवेश घेताना कॅपिटेशन फी, दरवर्षी दुरुस्तीची कामे निविदेशिवाय होत असून गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील इंडियन एज्युकेशन सोसायटी शिक्षण संस्थेच्या अनागोंदी गैरकारभाराबाबत फॉरेन्सिक चौकशी व त्यानंतर कारवाई करण्याचे आश्वासन मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी माहे मार्च, २०१८ मध्ये विधानपरिषेदत उपस्थित केलेल्या लक्षवेधीला उत्तर देताना सभागृहात दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त आश्वासनानुसार फॉरेन्सिक चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त आश्वासनाच्या अनुषंगाने सदरील शिक्षण संस्थेच्या कारभाराची चौकशी करण्याबाबत कार्यवाही करुन दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या सुमारे ७० शाळा असून काही शाळांमध्ये फी बाबत तक्रारी आहेत.
(२) होय.
(३) व (४) फॉरेन्सिक ऑडीट करणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील प्रश्नपत्रिका देण्याबाबत

**(२४) * ४२४९२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विद्यार्थ्यांना मराठीत परीक्षा देण्याची कायद्याने परवानगी असताना मुंबईतील गोरेगांव ते दहिसरपर्यंत अनेक महाविदयालयात कॉमर्सच्या विदयार्थ्यांना जाणीवपुर्वक इंग्रजीतील प्रश्नपत्रिका देण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मराठीत परीक्षा देता यावी याबाबत कार्यवाही करुन मराठी भाषेकडे दुर्लक्ष करणाऱ्या महाविद्यालयांमधील संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

विद्यार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार मराठी किंवा इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका पुरविण्यात येतात. जाणीवपुर्वक इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका

दिल्याबाबत अशी कोणतीही तक्रार विद्यार्थ्यांकडून नमूद कालावधीत विद्यापीठाकडे प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील माध्यमिक शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या समायोजनाबाबत

**(२५) * ४२२२३ श्री.ख्वाजा बेग : तारांकित प्रश्न क्रमांक ३४१५० ला दिनांक ८ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील सन २०१६-१७ च्या संचमान्यतेनुसार माध्यमिक शाळांमध्ये अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकांच्या समायोजनाचे काम शासनाच्या धोरणामुळे होत नसल्याने अनेक अतिरिक्त शिक्षकांचे वेतन अदा करण्यास जिल्हा प्रशासनास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१६-१७ च्या संचमान्यतेनुसार ३३३१ शिक्षक अतिरिक्त ठरले असून आतापर्यंत किती शिक्षकांचे समायोजन करण्यात आले आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिरिक्त ठरलेल्या व अन्य शाळेत बदली झालेल्या अतिरिक्त शिक्षकांचे वेतन नियमित करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

जिल्हास्तरावर ३३३१ पैकी १४६५ शिक्षकांचे समायोजन झाले असून ८९१ शिक्षक प्रत्यक्ष रुजू झाले आहेत. समायोजनाने प्रत्यक्ष रुजू झालेल्या शिक्षकांचे वेतन त्यांच्या रुजू झालेल्या शाळेतून व समायोजन न झालेल्या शिक्षकांचे वेतन त्यांच्या मूळ शाळेतून अदा करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिळ गाव व कल्याण खाडी परिसरात अनधिकृतपणे वॉश उद्योग सुरु असल्याबाबत

**(२६) * ४१५०१ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४०७७७ ला दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नामांकित ब्रँडच्या जीन्सची नक्कल करणाऱ्या उल्हासनगर येथील जीन्स कारखान्यांवर मा.न्यायालयाच्या आदेशानुसार कारवाई करण्यात आली तरीही या कारखान्यांनी आसपासच्या शहरात स्थलांतरण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबरनाथ शहर तालुक्याच्या ग्रामीण भागात तसेच ठाणे शहराच्या वेशीवरील खर्डी, शिळ, फडकेपाडा आणि कल्याण खाडी किनारी हे उद्योग सुरु झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कारखानदारांनी ज्या गावांमध्ये हे उद्योग स्थलांतरित केले आहेत त्याठिकाणी कारखान्यांचे दूषित पाणी जमिनीत खड्डे खोदून जिरविले जाते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पर्यावरणाचे रक्षण करण्याच्यादृष्टीने कार्यवाही करुन अनधिकृतपणे चालविल्या जाणाऱ्या जीन्स उद्योगांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) कल्याण शहरातील डोंबिवली औद्योगिक वसाहतीजवळ म्हारळगांव-०९, चौधरी कंम्पाउड ०३, तसेच अंबरनाथ व बदलापुर परिसरातील एकूण १६ जिन्स वॉश उदयोग मंडळाने बंद केले आहेत व भिवंडी तालुक्यातील ४० अनधिकृत जीन्स वॉशिंग उद्योगावर बंद करण्याचे आदेश पारीत केले आहेत.

शिळफाटा परिसराचे, म.प्र.नि. मंडळाचे अधिकारी व ठाणे महानगरपालिका यांचे अधिकारी यांचेमार्फत संयुक्त पाहणी सर्वेक्षण करण्यात आले. सदर पाहणी दरम्यान एकूण १६ जीन्स वॉश उद्योग या परिसरात आढळून आले. या उद्योगांना म.प्र.नि. मंडळाचे उत्पादन बंद करण्याचे निर्देश, दिनांक ०७/०४/२०१८ व दिनांक १९/०६/२०१८ रोजी देण्यात आलेले आहेत.

सदर उदयोगांना जल (प्रतिबंध व नियंत्रण प्रदूषण) प्रदूषण कायदा, १९७४ अंतर्गत बंदचे आदेश बजावण्यात आले आहेत तसेच त्यांची विद्युत पुरवठा तात्काळ बंद करण्याबाबत संबंधितांना कळविले आहे व सद्य:स्थितीत हे उदयोग बंद आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात आर.टी.ई. प्रवेशाच्या वेळापत्रकानुसार कामकाज होत नसल्याबाबत

**(२७) * ४२६०८ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुर्बल घटकांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी शासनाने सुरु केलेल्या आर.टी.ई. प्रवेशाचे पुणे शहरात वेळापत्रकानुसार कामकाज होत नसल्याने प्रवेश प्रक्रियेची पहिली यादी जाहिर होऊन दीड महिना झाला तरी प्रवेश पूर्ण झाले नसून अनेक शाळांनी प्रवेश नाकारल्याचे माहे मे, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार आर.टी.ई. प्रवेश नाकारणाऱ्या कोणकोणत्या शाळा आहेत, अशा शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ६८७/२०१८ दाखल झाल्याने पुणे जिल्ह्यातील आरटीई प्रवेश कामकाजाच्या वेळापत्रकामध्ये अंशत: बदल करण्यात आला होता. सदर याचिकेचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर पहिल्या फेरीची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. पुणे शहरामध्ये एकही प्रवेश पात्र इच्छुक विद्यार्थी पहिल्या प्रवेश फेरीमध्ये प्रवेशापासून वंचित राहिलेले नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षक भरतीत स्थानिकांना आरक्षण देण्याबाबत

**(२८) * ४२०७६ श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणात सन २०१० मध्ये राज्यस्तरीय शिक्षक भरतीत भरण्यात आलेल्या ५८९ शिक्षकांपैकी स्थानिक १३ उमेदवारांना संधी मिळाली असून सन २०१० नंतर मागील ८ वर्षात शिक्षक भरती झाली नसल्याने कोकणातील अनेक डी.एड्. व बी.एड्. उमेदवार नोकरीच्या प्रतिक्षेत असून नोकरीचे वय उलटून जाण्याची भिती त्यांच्यामध्ये निर्माण झाली असून शिक्षक भरतीत स्थानिकांना ७० टक्के आरक्षण मिळावे यासाठी रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्हा बेरोजगार संघटनेच्या शिष्टमंडळासह डी.एड्., बी.एड्. धारकांनी रत्नागिरीतील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात उपोषण करून जिल्हाधिकाऱ्यांना एक निवेदन सादर केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१० प्रमाणे आताच्या भरतीत गैरव्यवहार होत असून गुण वाढवून देण्याबाबतचे संभाषणही व्हायरल झाले असल्याने या रॅकेटची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी अशीही मागणी सदरहू निवेदनात करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सन २०१० मध्ये राज्यस्तरीय शिक्षक भरती झाल्यामुळे कोकणात परजिल्ह्यातील शिक्षकांची नियुक्ती झाली असून त्यांना मूळ जिल्ह्यात जाण्याची इच्छा असल्याने दरवर्षी सुमारे ५०० ते ६०० शिक्षकांची मूळ जिल्ह्यात बदली होत असल्यामुळे कोकणातील अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षक भरतीत स्थानिकांना ७० टक्के आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचे कार्यालयासमोर उपोषण केले, हे खरे आहे.
(२) सामाजिक माध्यमांवर अशा प्रकारच्या प्रसारित झालेल्या ध्वनीफितीसंदर्भात बंड गार्डन पोलीस ठाणे, पुणे येथे गुन्हा दाखल करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) अंशत: खरे आहे.
(४) व (५) शिक्षक भरती प्रक्रिया अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणीतील गुणाच्या आधारे "पवित्र" संगणकीय प्रणालीव्दारे करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २३ जून, २०१७ रोजी पारित केलेला असून त्यानुसार दिनांक ०६ जुलै, २०१८ पासून सदर संगणकीय प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली आहे. शैक्षणिक संस्थांच्या जाहिरातीस ऑनलाईन अर्जाव्दारे प्रतिसाद देताना उमेदवारांनी त्यांचा पसंतीक्रम देण्याची तरतूद आहे.

-----------------

## शिक्षकांना सेवा व वेतन संरक्षण मिळणेबाबत

**(२९) * ४२४१६ श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माध्यमिक विभागातून उच्च माध्यमिक विभागात नियमित शिक्षक म्हणून नियुक्ती मिळविणाऱ्या जेष्ठ माध्यमिक शिक्षकांच्या सेवेस व वेतनास संरक्षण मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक १५ सप्टेंबर, २०११ च्या निर्णयानुसार माध्यमिक विभागातून उच्च माध्यमिक विभागात नियमित शिक्षक म्हणून नियुक्ती मिळविणाऱ्या शिक्षकास त्यांच्या सेवेला संरक्षण मिळते पण वेतनास मिळत नसल्यामुळे अनेक जेष्ठ शिक्षक उच्च माध्यमिक श्रेणी स्वीकारत नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वेतनास संरक्षण दिल्यास शासनावर कोणताही अतिरिक्त भार येणार नसून माध्यमिक शिक्षकांची पदेही रिक्त होणार नाहीत तसेच त्यावर शासनास समायोजन करता येईल, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड येथील हंगामी वसतिगृहाच्या तपासणीमध्ये मुला-मुलींची पटसंख्या जास्त दर्शवून शासनाची फसवणूक केल्याबाबत

**(३०) * ४२६७६ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ऊसतोड मजुरांची मुले-मुली सुशिक्षित होण्याचे दृष्टीकोन ठेवुन शासनाने हंगामी वसतिगृहाची योजना सुरू करुन ऊसतोड मजुरांच्या पाल्यांना दर्जेदार राहण्याची, आहाराची व इतर हमी दिली असून सदर योजनेवर वसतिगृहांतील मुला-मुलींच्या पटसंख्येच्या प्रमाणात निधी देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बीड येथील हंगामी वसतिगृह तपासणीमध्ये १५ ते २० टक्के विद्‌यार्थी संख्येची तफावत निदर्शनास आली असून अचानक करण्यात आलेल्या तपासणीमुळे कागदोपत्री विद्‌यार्थ्यांची संख्या व प्रत्यक्षात संख्या यामध्ये तफावत असल्यामुळे शासनाची चार ते पाच कोटी रुपयांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुंटूर (ता.नायगांव, जि.नांदेड) शहरामध्ये पाणीपुरवठा सुरळीत करण्याबाबत

**(३१) * ४२२१३ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंटूर (ता.नायगांव, जि.नांदेड) शहरामध्ये पाईपलाईन फुटल्यामुळे मागील १५ दिवसांपासून पाणीपुरवठा बंद असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी या ठिकाणी होणाऱ्या गैरसोयीकडे प्रशासन दुर्लक्ष करीत असून येथील समस्या सोडविण्याची मागणी ग्रामस्थ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कुंटूर शहरामध्ये सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी कार्यवाही करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तशी कोणतीही तक्रार जिल्हा परिषद, नांदेड यांना प्राप्त नाही. तथापि, पाईपलाईनची दुरुस्ती तात्काळ करुन पाणीपुरवठा पुर्ववत सुरु आहे.

(३) कुंटूर गावाचा दिनांक ०८/०५/२०१८ ते दिनांक १३/०५/२०१८ दरम्यान पाच दिवस विहिरीजवळ उध्दरन नलिकेची सी.आय. फलँज फुटल्याने पाणीपुरवठा खंडीत झाला होता, तथापि, दिनांक १३/०५/२०१८ रोजी आवश्यक दुरुस्ती करुन तात्काळ पाणीपुरवठा पुर्ववत चालू करण्यात आला असून आजमितीस सुद्धा पाणीपुरवठा सुरळीत चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोकण विभागात विद्यार्थी संख्येअभावी
## शिक्षक अतिरिक्त झाल्याबाबत

**(३२) * ४२१५० श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण विभागात डोंगराळ, आदिवासी, अल्पसंख्यांक भाग जास्त प्रमाणात असून येथील शाळेतील अनेक शिक्षक विद्यार्थी संख्येअभावी अतिरिक्त झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २ फेब्रुवारी, २००९ च्या शासन आदेशाने वर्ग व तुकड्या टिकवण्यास विद्यार्थी संख्येत सवलत दिली असून सन २०१३-२०१४ च्या संचमान्यतेपासून पुढील संचमान्यतेमध्ये सदर आदेशाची अंमलबजावणी झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर संचमान्यता दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील तरतुदीनुसार शासन निर्णय दिनांक १३/१२/२०१३ व दिनांक २८/०८/२०१५ मधील तरतुदीनुसार पूर्वीची दिनांक २/२/२००९ मधील तरतुद अधिक्रमित झाल्यामुळे अंमलबजावणी झालेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामीण भाग, आदिवासी पाडे आणि सीमा भागात
## नवीन मराठी शाळा सुरु करण्याबाबत

**(३३) * ४२६२३ श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.सुभाष झांबड, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण भाग, आदिवासी पाडे आणि सीमा भागात नवीन मराठी शाळा सुरु होण्याची शक्यता संपुष्टात आली असून राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने सन २००९ साली अनुदानित मराठी शाळा सुरु करण्यासाठी घेतलेला बृहत आराखडा तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे दिनांक ८ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाला केवळ स्वयंअर्थसहाय्यित इंग्रजी माध्यमाच्या शाळांनाच परवानगी द्यावयाची असल्याने त्यांनी मराठी शाळांचा उक्त आराखडा रद्द केला, तसेच अनेक मराठी शाळा बंद करण्यात आल्याने शाळाबाहय मुलांची संख्या वाढत असून या निर्णयामुळे कोणीही मराठी शाळा सुरु करीत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील ग्रामीण भाग, आदिवासी पाडे आणि सीमा भागात नवीन मराठी शाळा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गौतम प्राथमिक, माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय (ठाणे) येथील विश्वस्तावर कारवाई करण्याबाबत

**(३४) * ४३५२१ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंदू मिहान एज्युकेशन सोसायटीच्या गौतम प्राथमिक, माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालय (ठाणे) येथील स्नेहसंमेलनासाठी नृत्याचा सराव करीत असताना झालेल्या गोंधळामुळे शाळेच्या शिल्पा गौतम नावाच्या विश्वस्तांची झोपमोड झाल्याने १८ मुलांना फायबरच्या पाईपने मारहाण केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शाळेच्या विश्वस्ताविरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी ३२/१८ भादंवि ३२४ अन्वये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ (Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, २०१५ च्या कलम ७५ नुसार ठाणे नगर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करुन दोषी महिलेला अटक करण्यात आली होती. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## "डॉक्टर विदाऊट बॉर्डर" कंपनीवर कारवाई करण्याबाबत

**(३५) * ४३५६१ श्री.परिणय फुके : तारांकित प्रश्न क्रमांक ४०३९८ ला दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परदेशात निर्यात करणाऱ्या "डॉक्टर विदाऊट बॉर्डर" कंपनीवर छापा टाकून क्षयरोग, एड्स आदि आजारांवरील रुपये २० लाख ५० हजार रकमेचा साठा जप्त करुन औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यातील तरतूदींचे उल्लंघन झाल्याने कायद्यांतर्गत तपास पूर्ण करुन न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विश्लेषणासाठी घेतलेल्या नमुन्यांपैकी नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत काय, तसेच प्रलंबित अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी सुरु असलेला पाठपुरावा पूर्ण झाला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डॉक्टर विदाऊट बॉर्डर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) होय.
(३) उपरोक्त प्रकरणी डॉक्टर विदाऊट बॉर्डर (इं), प्रा.लि. या संस्थेचे संचालक व इतर ०५ उत्पादन संस्था व त्यांच्याशी संबंधित जबाबदार एकूण १७ व्यक्तींविरुध्द औषधे व सौंदर्य प्रसाधने कायद्यांतर्गत दिनांक २३/०३/२०१८ रोजी मा.महानगर दंडाधिकारी, शिवडी, मुंबई यांच्या न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे. तसेच सदर संस्थेचे औषधे विक्री परवाने ७ दिवसांच्या कालावधीसाठी निलंबित करण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## व्हीजेटीआय अभियांत्रिकी महाविद्यालय (मुंबई) मधील विद्यार्थ्यांच्या विनयभंग प्रकरणी चौकशी करण्याबाबत

**(३६) * ४३६४२ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) व्हीजेटीआय अभियांत्रिकी महाविद्यालय, (मुंबई) मधील विद्यार्थ्यांच्या विनयभंग प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश मा.उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री यांनी दिनांक ३० मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) होय.

(२) सदर प्रकरणी महिला व बालविकास विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०४/१०/२०१० व मानव संसाधन विकास मंत्रालय (विद्यापीठ अनुदान आयोग) यांची अधिसूचना दिनांक ०२/०५/२०१६ मधील तरतुदीनुसार तंत्रशिक्षण संचालनालयस्तरावर तसेच व्हीजेटीआय अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या Internal Complaints Committee मार्फत चौकशी करण्यात आलेली आहे.

(अ) सदर चौकशीमध्ये संबंधित प्राध्यापक सकृतदर्शनी दोषी आढळल्याने संबंधितास दिनांक ३१/०५/२०१८ पासून निलंबित करण्यात आले आहे.

(ब) याबाबत तक्रारदाराकडून माटुंगा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र. १४३/२०१८, कलम ३५४, ३५४ (अ)(१)(१) भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित प्राध्यापकाने गुन्ह्याची कबूली दिल्याने त्यांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, माटुंगा पोलीस स्टेशन यांचेकडून दिनांक ०१/०६/२०१८ रोजी अटक करण्यात आली व दिनांक ०२/०६/२०१८ रोजी जामिनावर सोडण्यात आले आहे.

(क) व्हीजेटीआय ही संस्था शासन अनुदानित स्वायत्त संस्था असल्याने संबंधित दोषी अध्यापकाचे नियुक्ती प्राधिकारी हे संस्थेचे व्यवस्थापन मंडळ आहे. त्यानुसार संबंधित दोषी अध्यापकाला दिनांक १५/०६/२०१८ रोजी दोषारोप पत्र बजाविण्यात आले असून त्याच्याविरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बोईसर (ता.जि.पालघर) येथील सिडको भागात अवैधपणे विनापरवाना सुरु असलेला पाणी उपसा बंद करण्याबाबत

**(३७) * ४३८४३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (ता.जि.पालघर) येथील सिडको भागात ग्रामपंचायत सदस्य श्री.ठाकूर यांनी बोअरवेलद्वारे पाण्याचा बेसुमार उपसा करुन त्याचा वापर

गाड्या धुण्यासाठी व खाजगी कारखान्यांना टँकरद्वारे अवैधरित्या पाणी पुरविण्यासाठी केल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाण्याचा बेसुमार उपसा केल्याने सदर स्थानिक परिसरातील भूगर्भातील पाण्याची पातळी वेगाने कमी झाल्याने नागरिकांना पाण्याअभावी पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विनापरवाना सुरु असलेला पाणी उपसा बंद करुन संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) अंशत: खरे आहे.

मौजे बोईसर, ता.जि.पालघर येथील सिडको भागात ग्रामपंचायत सदस्य श्री.अजय मधुकर ठाकूर यांनी सुमारे २००१ च्या दरम्यान अंदाजे ४५ मीटर खोलीची विंधन विहीर घेतली आहे. सदर विंधन विहीर ही नाल्याच्या काठावर असून नाला बारमाही वाहणारा असल्यामुळे विंधन विहीरीची क्षमता चांगली आहे. उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी तहसिलदार यांच्यामार्फत या विंधन विहीरीचे अधिग्रहण करण्यात आले आहे. या विंधन विहीरीतील पाणी पिण्याकरीता व इतर बाबीकरीता वापरण्यात येते.

(२) या भागातील मागील ५ वर्षांच्या पाण्याच्या सरासरी पातळीशी तुलना केली असता भूजल पातळीत ०.२० मीटर घट झाल्याचे निदर्शनास आले आहे. तथापि ही घट या विंधन विहीरीमधून भूजल उपश्यामुळे झालेली आहे, हे म्हणणे योग्य नाही. कारण सिडको भागात अन्य खाजगी विंधन विहीरीदेखील आहेत.

सिडको भागाच्या जवळील काही गृहनिर्माण संस्थांमधील घेण्यात आलेल्या विंधन विहीरीचे पाणी उन्हाळ्यात संपल्यानंतर त्या भागात या विंधन विहीरीचे पाणी टँकरने पुरविण्यात येते.

(३) व (४) विंधन विहीरीतील पाणी उपश्यामुळे भूजल पातळीत परिणाम झालेला नसल्याने कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यात फ्लोराईड युक्त जलस्त्रोत आढळल्याबाबत

**(३८) * ४२४५५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती भुजल सर्वेक्षण विभागाच्या प्रयोगशाळांनी केलेल्या एका तपासणीत सदरहू विभागातील पिण्याच्या पाण्याचे २१ हजार १४७ नमुने पिण्यास अयोग्य असल्याचे दिनांक ७ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे एप्रिल, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत ७६ हजार ४५३ पाणी नमुन्यांची रासायनिक व जैविक तपासणी करण्यात आली असता पाण्यात विरघळलेले रासायनिक घटक आणि पाण्यात संचार करणारे सूक्ष्म जीवजंतू मानवी आरोग्यावर प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे परिणामकारक असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच यवतमाळ जिल्ह्यात फ्लोराईडयुक्त पाण्यामुळे शंभराहून अधिक शेतकरी, शेतमजूरांचा मृत्यू झाला असून ४९३ लोकवस्त्यांमध्ये फ्लोराईडयुक्त पाण्याचा पुरवठा होत असल्याचे दिनांक २९ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आल्याने सदर फ्लोराईडयुक्त पाण्याबाबत नागपूर खंडपीठाने यवतमाळ जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यवतमाळ जिल्ह्यातील गावकरी किडनीच्या आजाराने त्रस्त झाले असून त्यांना डायलिसीससाठी दररोज अमरावतीला उपचारासाठी जावे लागते, तसेच यवतमाळ जिल्ह्यातील ४५३ गावांमधील पाण्याचे स्त्रोत फ्लोराईडयुक्त असल्याची शासकीय आकडेवारी असून प्रत्यक्षात हजारो गावांना दूषित पाणी प्यावे लागत असल्याने यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी, पांढरकवडा, झरीजामणी, उमरखेड, दिग्रस, नेर, दारव्हा या तालुक्यांमधील खेड्यात किडनी आजाराच्या रूग्णांचे प्रमाण दर दिवशी वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मानवी आरोग्यावर होत असलेला परिणाम लक्षात घेवून यवतमाळ जिल्हा फ्लोराईड मिश्रित जलस्त्रोत मुक्त करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अमरावती भूजल सर्वेक्षण विभागाच्या प्रयोगशाळांनी माहे एप्रिल, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत पिण्याच्या पाण्याच्या केलेल्या एकूण ७८,४०१ नमुन्यांची रासायनिक व जैविक तपासणी केली असता २२,२८२ नमुने BIS मानकानुसार अयोग्य असल्याचे आढळून आले. सदर स्त्रोतांमधील पाणी पिण्यामध्ये आल्यास तसेच संबंधितांची रोगप्रतिकारक शक्ती कमी असल्यास मानवी आरोग्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे परिणाम होऊ शकतो.

(३) फ्लोराईडयुक्त पाण्याबाबत नागपूर खंडपीठाने यवतमाळ जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांना नोटीस बजावून उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, फ्लोराईडयुक्त पाण्यामुळे शेतमजुर व शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे आढळून आलेले नाही. सन २०१७-१८ मधील पाणी नमुने रासायनिक तपासणी अभियान (मान्सुन पूर्व) अंतर्गत भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, यवतमाळ या कार्यालयाच्या अधिनस्त प्रयोगशाळेत ७४२१ पाणी नमुन्यांची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये २७३ गावांमधील पाणी स्त्रोतातील ४९३ पाणी नमुन्यांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण BIS मानकापेक्षा जास्त असल्याचे आढळून आले.

(४) हे खरे नाही. यवतमाळ जिल्ह्यामध्ये २०१७-१८ मध्ये झालेल्या ७४२१ पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोताची रासायनिक तपासणी केली असता २७३ गावांमधील ४९३ पाण्याच्या स्त्रोतांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण १.५ PPM पेक्षा जास्त आढळून आले आहे. तथापि ग्रामीण भागामधील शासकीय यंत्रणेच्या आकडेवारीनुसार यवतमाळ जिल्ह्यामधून अमरावती येथे डायलेसिसकरीता रुग्ण संदर्भित केल्याची नोंद नाही.

(५) यवतमाळ जिल्हयातील २७३ गावांमधील ४९३ पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांमध्ये फ्लोराईडचे प्रमाण १.५ मिलिग्रॅ/लिटर पेक्षा जास्त असल्याचे आढळून आले आहे. सदर गावांना १०९० हातपंप, ६३२ सार्वजनिक विहिरी, ७५ विद्युतपंप, १९४ नळ पाणीपुरवठा योजनांद्वारे शुध्द पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सदर ४९३ पाणी साठे पिण्याकरीता बंद करण्यात आलेले आहेत. तसेच सदर स्त्रोतांना लाल रंगाचे पट्टे लावण्यात आले असून सदर पाणी पिण्यास अयोग्य आहे, असे सूचनाफलक स्त्रोतासमोर लावण्यात आले असून या पिण्याच्या पाण्याच्या साठ्याऐवजी पर्यायी पाणी पुरवठ्याच्या सोयी जिल्हा परिषदेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच जिल्हयात ८ गावांत D.F.U. (डिफ्लोरीडेशन युनिट) बसविण्याचे काम सुरु असून लवकरच कार्यान्वित होतील.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत

**(३९) * ४१६९९ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३८९५६ ला दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००५ पासून खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकेतर भरती प्रक्रियेला बंदी घालण्यात आली असून सन २००५ नंतर अनेक शिक्षकेतर कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत व काही अपघाताने मृत्यूमुखी पडले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांनी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी संबंधित संस्थेत अर्ज केले असून शिक्षकेतर भरती प्रक्रियेला बंदी असल्याने सदर कर्मचाऱ्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली जात नसल्याने मृत्यूमुखी पडलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटूंबाला आर्थिक समस्येला सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकेतर अनुकंपा तत्वावरील भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) व (४) शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सुधारित आकृतिबंध निश्चित करण्याची कार्यवाही शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

## राज्यात विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या खाद्य व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत

**(४०) * ४२१९७ श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अन्न व औषध प्रशासनाकडून १६०० प्रकरणांपैकी १०५७ प्रकरणात आवश्यक दस्तऐवज सादर करण्यात आले नसतानाही परवाने जारी करण्यात आल्याचे कॅगच्या अहवालातून माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात रुपये १६.८६ लाख खाद्य व्यावसायिकांपैकी रुपये ९.४३ लाख खाद्य व्यावसायिकांनी माहे जून, २०१६ पर्यंत नोंदणी केली असून उर्वरित रुपये ७.४३ लाख खाद्य व्यावसायिक नोंदणी आणि विनापरवाना व्यवसाय करीत असल्याचेही कॅगच्या अहवालातून निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन परवान्यांची मुदत संपलेली असताना, विनापरवाना व्यवसाय करणाऱ्या खादय व्यावसायिकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाकडून १६०० प्रकरणांपैकी १०५७ प्रकरणात आवश्यक दस्तऐवज सादर करण्यात आले नसतानाही परवाने जारी करण्यात आल्याचे कॅगच्या सन २०१६-१७ च्या अहवालात नमूद करण्यात आले आहे, ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व्यावसायिकांच्या परवान्यांची मुदत संपलेली असल्यास त्यास विनापरवाना समजून न्यायालयात खटले दाखल करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात शाळांमध्ये शिक्षक भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४१) * ४२२७४ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी आवश्यक असणाऱ्या बुध्दीमत्ता आणि अभियोग्यता चाचणीत गुण वाढवून देणारे रॅकेट सक्रिय झाले असल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) राज्यातील शाळांमध्ये शिक्षक भरतीसाठी घेण्यात आलेल्या चाचणी परीक्षेमध्ये गुण वाढवून देण्याचे रॅकेट सोशल मिडियावर कार्यरत असल्याची ध्वनीफित समाजमाध्यमांवर प्रसारित झालेली असल्याचे आढळते. याबाबत बंडगार्डन पोलीस ठाणे, पुणे येथे तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

-----------------

## खाजगी अनुदानित प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्वतंत्र वेतनश्रेणी देण्याबाबत

**(४२) * ४२३८८ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना केंद्र शासनाच्या ७ व्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी शिफारस करण्याच्यादृष्टीने शासनाने राज्य वेतन सुधारणा समिती-२०१७ स्थापन केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील खाजगी अनुदानित अध्यापक विद्यालयांना स्वतंत्र दर्जा व प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना स्वतंत्र वेतनश्रेणी देण्याबाबत तसेच खाजगी अनुदानित शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी देण्याबाबतच्या शिफारशी/निवेदने नागपूर विभागाचे शिक्षक लोकप्रतिनिधींनी दिनांक २०/०९/२०१७, ११/१२/२०१७, २१/०२/२०१८, २८/०२/२०१८ व दिनांक ०४/०३/२०१८ रोजी राज्य वेतन सुधारणा समितीकडे सादर केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निवेदने/शिफारशी वित्त विभागामार्फत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडे दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी प्रधान सचिव, वित्त विभाग यांच्या पत्रानुसार पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन निवेदनातील शिफारशीनुसार शालेय शिक्षण विभागाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील खाजगी चित्रकला, फार्मसी व अध्यापक महाविद्यालयांना वेतन अनुदान देण्याबाबत

**(४३) * ४१४२५ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३८१७१ ला दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील खाजगी चित्रकला, फार्मसी व अध्यापक महाविद्यालयांना ९० टक्क्यांऐवजी १०० टक्के वेतन अनुदान दयावे याबाबत संबंधित संचालकांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयांची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

राज्यातील खाजगी चित्रकला व फार्मसी महाविद्यालयांना ९० टक्के ऐवजी १०० टक्के वेतन अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव संचालक, कला व संचालक, तंत्रशिक्षण यांनी शासनास सादर केला आहे. राज्यातील खाजगी अनुदानित अध्यापक महाविद्यालयांना १००% वेतन अनुदान दिले जात असल्यामुळे संचालक, उच्च शिक्षण यांचेकडून याबाबत कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने उपस्थित केलेल्या मुद्दयांची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४४) * ४१९५७ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या निष्काळजीपणामुळे गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, पदवीधर शिक्षक व उपशिक्षकांची विद्यमान शैक्षणिक वर्षात ७७ पदे रिक्त असल्याचे दिनांक २१ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यांमध्ये ६९७ पदे मंजूर असून सध्या ६२० पदे कार्यरत आहेत त्यामध्ये मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, पदवीधर शिक्षक, उपशिक्षक व उर्दू शिक्षक अशी पदे रिक्त असल्याने विदयार्थ्यांच्या शैक्षणिक वर्षावर त्याचा परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मंगळवेढा जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२), (३) व (४) उपशिक्षणाधिकारी किंवा गटशिक्षणाधिकारी संवर्गात सरळसेवेने, पदोन्नतीने तसेच मर्यादित विभागीय परीक्षेद्वारे पद भरती करण्याची कार्यवाही सुरू आहे. केंद्रप्रमुखांची पदे पदोन्नतीने भरलेली असून स्पर्धा परीक्षा व सरळसेवेने भरावयाची पदे शासनस्तरावरून भरण्यात येत आहेत. मुख्याध्यापक तसेच पदवीधर शिक्षक संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. उपशिक्षकांची पदे आंतरजिल्हा बदलीने समानीकरण तत्वावर भरण्यात आली आहेत. तसेच रिक्त पदांचा अतिरिक्त कार्यभार संबंधितांना सोपविण्यात आला असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होणार नाही, याची काळजी घेण्यात येत आहे.

-----------------

## सातारा जिल्हयातील दूध भेसळ रोखण्याबाबत

**(४५) * ४२७३३ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यात अन्न व औषध प्रशासन विभागाने हाती घेतलेल्या दुध डेअरींच्या तपासणी मोहिमेत १३ डेअरींचे नमुने कमी दर्जाचे असल्याचे आढळून आल्याने दुधात भेसळ असल्याचा अहवाल अन्न औषध प्रशासनाने तयार केल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्यातील तरतुदी दूध भेसळ करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्यास योग्य आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त, प्रकरणी शासनाने चौकशी करुन दूध भेसळ करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कार्यवाही करुन प्राथमिक तपासणीत दोषी आढळून आलेल्या संस्था व व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) अन्न व औषध प्रशासनाने सातारा जिल्ह्यात सन २०१७-२०१८ या कालावधीत घेण्यात आलेल्या दूधाच्या एकूण ११० नमुन्यांपैकी १९ नमुने अप्रमाणित दर्जाचे आढळून आलेले आहेत. सदरचे १९ अप्रमाणित नमूने १३ डेअरीमधील आहेत.

(२) सद्य:स्थितीत अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४ रद्द होवून अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ संपूर्ण देशात लागू करण्यात आला आहे.

(३) उक्त अप्रमाणित करण्यात आलेल्या १९ दुध नमुन्यासाठी न्यायनिर्णय प्रकरणे दाखल करण्यात आलेली आहेत. त्यापैकी १२ प्रकरणी एकूण रुपये १,४८,०००/- दंड ठोठावण्यात आला आहे. उर्वरीत ७ प्रकरणे न्यायनिर्णयासाठी प्रलंबित आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विद्यार्थी गणवेशापासून वंचित असल्याबाबत

**(४६) * ४१७७० श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.रविंद्र फाटक, ॲड.अनिल परब, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार, श्रीमती स्मिता वाघ, श्री.प्रविण दरेकर, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यार्थ्यांना सर्वशिक्षा अभियानांतर्गत गणवेश देण्याची योजना सुरु करण्यात आली असून यापुर्वी संबंधित शाळा विदयार्थ्यांना गणवेश खरेदी करुन देत होत्या तथापि, माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने विदयार्थ्यांच्या गणवेशाची रक्कम विद्यार्थ्यांच्या पालकांच्या खात्यात जमा करण्याचे आदेश दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात उक्त योजनेसाठी ३७ लाख ६२ हजार विद्यार्थी पात्र असून उस्मानाबाद, परभणी, हिंगोली व लातूर जिल्हयातील ५० टक्के विद्यार्थ्यांना गणवेशाची रक्कम मिळाली नाही तसेच शासनाने विद्यार्थ्यांच्या गणवेशाचे पैसे त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यासाठी विद्यार्थ्यांना बँक खाते उघडण्याचे आदेश दिले असतांनाही अदयापही राज्यातील सहा हजार शाळांतील लाखो विदयार्थ्यांचे खाते उघडले नसल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, तसेच राज्यातील सहा हजार शाळांमध्ये कोणकोणत्या जिल्हयातील शाळांचा समावेश आहे व त्यांची नावे काय आहेत,

(३) असल्यास, राज्यातील शासकीय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये शिकत असलेल्या उपेक्षित घटकातील बहुतांश विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मोफत गणवेशाची रक्कम मिळाली नसल्याचे तसेच राज्यातील जिल्हा परिषद शाळेतील लाखो विद्यार्थी गणवेशापासून वंचित असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून राज्यात सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात पहिली ते आठवीच्या वर्गात शिक्षण घेत असलेल्या सर्व

घटकातील विदयार्थी, अनुसूचित जाती, जमाती, दारिद्ररेषेखालील सर्व घटकांच्या ३७ लाख ६२ हजार २७ विद्यार्थ्यांच्या प्रत्येकी २ मोफत गणवेशासाठी चारशे रुपयाची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा करणे बंधनकारक असतानाही १० लाख ९० हजार ६३३ मुलांचे बँक खाते उघडले गेले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या सन २०१६ च्या शासन निर्णयानुसार लाभार्थ्यांने अगोदर गणवेश खरेदी केलेली पावती सादर केली तरच बँक खात्यात रक्कम वर्ग करण्याची तरतुद केली असून राष्ट्रीयकृत बँकेत विद्यार्थी आणि त्यांच्या आईचे संयुक्त खाते काढण्यासाठी अनेक समस्या येत असल्याने ग्रामीण भागात सर्व विद्यार्थ्यांकडे बँक खाती नसल्याने त्यांना गणवेशापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी मंजूर करण्यात आलेले अंदाजे रुपये ६४ कोटी शाळेकडे प्रलंबित असून १५ लाख विद्यार्थी शैक्षणिक वर्ष संपले तरीही गणवेशापासून वंचित असल्याचे दिनांक २ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पात्र विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडून १५ लाख ८८ हजार ४८० विद्यार्थ्यांना गणवेश देण्याबाबत तसेच गरीब व गरजू विद्यार्थांच्या बँक खात्यात गणवेशाची रक्कम जमा करण्याबाबत कार्यवाही करुन शासनाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या राज्यातील सहा हजार शाळांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) काही बँकांच्या असहकार्य धोरणांमुळे सर्व जिल्हयांमधील योजनेच्या पात्र विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांची बँकेत अद्याप खाती उघडण्यात आली नसल्याने सदर विद्यार्थ्यांची बँकेत खाती उघडण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) हे खरे आहे.

(४) हे खरे नाही.

(५) व (६) सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षामध्ये मोफत गणवेश योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी डिसेंबर, २०१७ पर्यंत बँकेत खाती न उघडलेल्या विद्यार्थ्यांना थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात लाभाची रक्कम जमा करण्याच्या योजनेतून सुट देण्यात आली होती.

स्थानिक पातळीवरील काही बँकांच्या असहकार्य धोरणामुळे विद्यार्थ्यांची Zero Balance खाती उघडण्यात अडचणी निर्माण होत असल्याने विद्यार्थ्यांची Zero Balance वर बँक खाती उघडण्याबाबत जलद कार्यवाहीसाठी बँकांना आवश्यक त्या सूचना देण्याबाबत वित्त विभागास विनंती केली आहे.

-----------------

## महाराष्ट्रातील शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्यादृष्टीने क्लस्टर विद्यापीठाला प्रोत्साहन देण्याबाबत

**(४७) * ४३२०६ श्री.रविंद्र फाटक, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील शैक्षणिक गुणवत्ता अधिक वाढविण्याच्यादृष्टीने राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियानाच्या माध्यमातून महाराष्ट्रात क्लस्टर विद्यापीठाला प्रोत्साहन देण्यासाठी तीन क्लस्टर विद्यापीठांचा प्रस्ताव राज्य शासनामार्फत राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा) कडे पाठविण्याचा निर्णय दिनांक ९ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्लस्टर विद्यापीठांचे व त्यासाठी घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे, तसेच असा प्रस्ताव रुसाकडे पाठविण्यात आला आहे काय, तीन क्लस्टर विद्यापीठे कोणकोणती आहेत, या प्रस्तावास रुसाची मान्यता मिळाली आहे काय, यासंदर्भातील प्रस्तावास रुसाकडून मान्यता मिळाली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावांतर्गत विद्यार्थी व शिक्षक यांचे हित, प्रगती कशाप्रकारे साध्य करण्याचे अपेक्षित आहे, तसेच या क्लस्टर विद्यापीठांची निवड कशाप्रकारे करण्यात येणार आहे, यासाठी प्रत्येकी किती निधी लागणे अपेक्षित आहे व तो कशाप्रकारे उपलब्ध करण्यात येणार आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्याच्यादृष्टीने क्लस्टर विद्यापीठाला प्रोत्साहन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही. महाराष्ट्र राज्य रुसा परिषदेच्या दिनांक ९ मे, २०१८ च्या बैठकीमध्ये ३ क्लस्टर विद्यापीठांच्या प्रस्तावाबाबत तसेच क्लस्टर विद्यापीठाच्या विधेयकाच्या मसुद्यावर चर्चा झाली.
(२), (३) व (४) महाराष्ट्र राज्य रुसा परिषदेमध्ये क्लस्टर विद्यापीठाचा प्रस्ताव तत्वत: मान्य करण्यात आला. क्लस्टर विद्यापीठाच्या स्थापनेसाठी स्वतंत्र विधेयकाची गरज आहे. यासाठी राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा) अंतर्गत कार्यगटाची स्थापना शासन निर्णय दिनांक ६ जुलै, २०१८ अन्वये केली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात क्रीडा संकुल उभारण्याबाबत

**(४८) * ४१७३४ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात क्रीडापटू तयार करण्यासाठी क्रीडा विभागाने केंद्र शासनाकडून सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये घेतलेला निधी परत केल्याचे तसेच क्रीडा संकुलाच्या उभारणीच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन न दिल्याचे कॅगच्या अहवालातून माहे मार्च, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील खेळाडूंना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करण्याच्यादृष्टीने शासनाच्यावतीने एमआयडीसी परिसरात रुपये १३ कोटी १२ लाख खर्चाची प्रशासकिय मान्यता असलेले क्रीडा संकुल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदर संकुलाच्या बांधकामाला दिनांक ४ मार्च, २०१४ रोजी सुरुवात झाली परंतु मागील चार वर्षात या संकुलाचे केवळ ३० टक्के बांधकाम पूर्ण झाले असून उर्वरित बांधकाम शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्याने प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, क्रीडा विभागाकडे निधी उपलब्ध असूनही खेळाडूंसाठी कॅम्प न भरविणे तसेच पुणे, रत्नागिरी, नाशिक, औरंगाबाद व अमरावती येथील क्रीडा संकुलांची योग्य देखभाल केली जात नसून खेळाडू नव्याने निर्माण करण्यासाठी कार्यवाही न करणे याबाबी कॅगच्या माध्यमातून निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संकुलाचे काम त्वरित होण्याकरीता निधी उपलब्ध करण्याबाबत तसेच क्रीडा विभागाच्या कारभाराची चौकशी करण्याबाबत कार्यवाही करुन संबंधित निधी खर्च न करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) सन २०१६-१७ यावर्षाकरीता माहे जानेवारी, २०१७ मध्ये तरतूद प्राप्त झालेली होती. तथापि याच महिन्यामध्ये काही खेळप्रकारांच्या संघटनेद्वारा राष्ट्रीय स्पर्धा व प्रशिक्षण शिबीरांचे आयोजन असल्याने व माहे फेब्रुवारी व मार्च या महिन्यामध्ये खेळाडूंच्या १० वी व १२ वी च्या परिक्षांचा कालावधी असल्याने प्रशिक्षण आयोजित होऊ शकले नाही.

पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती विभागीय क्रीडा संकुलांमध्ये नियमित प्रशिक्षण व स्पर्धा उपक्रमाकरीता होत आहे. त्याचप्रमाणे संकुलांची देखभाल व स्वच्छता राखण्यात येत आहे.

जिल्हा क्रीडा संकुल, रत्नागिरी येथे बहुउद्देशिय हॉल, व्यायामशाळा, बास्केटबॉल कोर्ट, खो-खो मैदान, कार्यालयीन इमारत, जलतरण तलाव इ. क्रीडा बाबी पूर्ण झालेले आहे. त्याचा वापर खेळाडू व नागरिकांद्वारे होत असून त्याची योग्य देखभाल व स्वच्छता करण्यात येते.

राज्यामध्ये ११ क्रीडा प्रबोधिनीमध्ये १६ क्रीडा प्रकाराचे प्रशिक्षण खेळाडूंना देण्यात येते. तसेच ३० खेळाडूंना शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.

तसेच जिल्हास्तरावर जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र व तालुकास्तरावर तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्र योजनेंतर्गत उपलब्ध क्रीडा मार्गदर्शकाद्वारे नवोदित खेळाडूंना विविध खेळांचे प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांच्या उपजत क्रीडा गुणांना वाव देवून नवीन खेळाडू निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हापूस आंबा पिकविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या इथ्रेल या बायर कंपनीच्या उत्पादनावर बंदी घालण्याबाबत

**(४९) * ४१८९० श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई कृषी उत्पन्न घाऊक फळ बाजारात हापूस आंबा पिकविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या इथ्रेल या बायर कंपनीच्या उत्पादनावर अन्न व औषध प्रशासन विभागाने बंदी आणली असल्याचे दिनांक २६ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे एफडीएच्या पथकाने एपीएमसी फळ बाजारात धाड टाकून व्यापाऱ्यांकडील हापूसचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविले असता सदरहू बाजारातील निर्यातदार, मॉलधारक आणि मोठे व्यापारी हे हापूस पिकविण्यासाठी रॅपिंग चेंबरचा वापर करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच कृषी विभागाने सदरहू बाजारात इथिलीन गॅसचा वापर करण्याकरीता परवानगी दिली असून एफडीएने इथ्रेल या द्रव्यात असलेला इथोफिन हा घटक आरोग्यास अपायकारक असल्याचे सांगितले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन इथ्रेल या बायर कंपनीच्या उत्पादनावर बंदी घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.

(२) होय खरे आहे.

(३) व (४) इथिलिनचा विहीत मात्रेमध्ये (१०० पीपीएम) वापर करण्यास कृषी विभाग व अन्न सुरक्षा व मानदे कायद्यानुसार परवानगी आहे. मात्र इथोफॉन हे किटकनाशक असल्यामुळे त्याचा वापर फळे पिकविण्यासाठी करता येणार नसल्याचे अन्न सुरक्षा व मानदे प्राधिकरण यांनी कळविले आहे. मात्र कैंद्रीय किटकनाशके मंडळ व नोंदणी समिती, फरिदाबाद यांनी मे.बायर क्रॉप्स सायन्स लि. यांना इथोफॉन ३९% एसएल या किटकनाशकासाठी इथ्रेल या ट्रेड नावाने नोंदणी प्रमाणपत्र प्रदान केले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शालेय विद्यार्थ्यांना अवांतर पुस्तके देण्याऐवजी आगंतुक पुस्तके दिल्याबाबत

**(५०) * ४१२९६ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाने शालेय विद्यार्थ्यांना अवांतर पुस्तके देण्याचा स्तुत्य उपक्रम सुरु केला असून या उपक्रमाद्वारे अवांतर पुस्तकांची निवड करताना त्यात आगंतुक पुस्तकांची भर पडल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शालेय शिक्षण विभागाने पुस्तकांची सुधारीत निविदा काढून नामांकित पुस्तकांच्या प्रकाशनांकडेच दुर्लक्ष केल्याने प्रकाशकांनी मा.शालेय शिक्षण मंत्री महोदयांना पत्र लिहून नाराजी व्यक्त केली असून मा.मंत्री महोदयांनी याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैधमापनशास्त्र विभागाने वजन, काटे व मापे यांच्या परवाना शुल्कातील दरवाढ रद्द करण्याबाबत

**(५१) * ४३२९९ श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैधमापनशास्त्र विभागाने वजन, काटे व मापे या विभागाच्या उत्पादन, विक्री व दुरुस्ती व काटे, वजन, मापे यांच्या वार्षिक पडताळणी शुल्कात दिनांक २० एप्रिल, २०१८ च्या अधिसूचनेनुसार दुप्पट दरवाढ केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अधिसूचना लागू होण्याअगोदर वैधमापन शास्त्र विभाग मुख्यालय, विभागीय कार्यालय अथवा जिल्हा कार्यालयाने कोणत्याही प्रसिध्दी माध्यमांद्वारे अथवा वर्तमानपत्रात त्याची प्रसिध्दी न केल्यामुळे नागरिक, व्यापारी, लघुउद्योजक, दुकानदार व वजन-मापे परवानाधारकांना सदरहू अधिसूचने संदर्भात हरकती/सूचना वेळेत देता न आल्यामुळे परवाना व पडताळणी शुल्कात केलेली वाढ रद्द करण्याबाबत मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री, प्रधान सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग तसेच आयुक्त, वैधमापनशास्त्र, महाराष्ट्र शासन यांना लेखी निवेदन माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनाच्या अनुषंगाने अधिसूचना रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) अंशत: खरे आहे.

परवान्यासंदर्भातील शुल्कवाढ ही पूर्वीच्या शुल्काच्या तुलनेत दुप्पट आहे. तथापि, काही तोलन-मापन साहित्याबाबतची पडताळणी शुल्क वाढ ही दुप्पटीपेक्षा कमी आहे.
(२) परवाना व पडताळणी शुल्कात केलेली वाढ रद्द करणेबाबत शासनास निवेदने प्राप्त झालेली आहेत.
(३) वजने, मापे, तोलन व मापन उपकरणांच्या विहित शुल्कामध्ये तसेच मुद्रांक शुल्क व अन्य शुल्कामध्ये वाढ करण्याच्या अनुषंगाने जनतेच्या हरकती व सूचना मागविण्याकरीता अधिसूचनेचे प्रारूप महाराष्ट्र शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-अ मध्ये दिनांक २२/२/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. त्यानुषंगाने विहित मुदतीत प्राप्त झालेल्या हरकती/सूचना अधिसूचनेचा मसूदा अंतिम करण्यापूर्वी विचारात घेण्यात आलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील शालेय शिक्षण परिक्षेच्या उत्तरपत्रिका नियामकांकडे प्रलंबित असल्याबाबत

**(५२) * ४२८७१ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.चंद्रकांत रघुवंशी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागाने शिक्षकांच्या मागण्या संदर्भात शासनादेश न काढल्यामुळे शालेय शिक्षण परिक्षेच्या ८५ लाख उत्तरपत्रिका नियामकांकडे (मॉडरेटर) प्रलंबित असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या निकालावर त्याचा परिणाम होत असल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शिक्षकांच्या मागण्यांचा अध्यादेश काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच शिक्षकांच्या मागण्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) परीक्षक व नियामक यांनी निर्धारित वेळेत उत्तरपत्रिका मंडळाकडे जमा केलेल्या आहेत. यामुळे राज्य मंडळाने वेळेत निकाल जाहीर केलेला आहे.
(२) शिक्षक संघटनांच्या मागण्यांबाबत दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजी बैठक घेण्यात आली असून याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षकांना निवडणूकांची कामे (बीएलओ) देण्यात येत असल्याबाबत

**(५३) * ४२२८६ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.जयंत पाटील, श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांमधील शिक्षकांची पेपर तपासणी, निकाल, दहावी पुनर्रचित अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण इत्यादी कामे सुरु असतानाच शासनाने समग्र शिक्षा अभियान योजनेसाठी ऑनलाईन माहिती भरुन देण्याचे आदेश काढले असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच राज्यात शिक्षकांना मतदार संघातील ओळखपत्राचे वाटप करणे, दिव्यांग मतदारांचा शोध घेणे यासह इतर बीएलओची कामे दिली जात असून मुंबईच्या बहुतांश शिक्षकांना निवडणूकांची कामे (बीएलओ) दिल्याने शिक्षकांवरील कामाचा ताण वाढत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शालेय निकालांसह समग्र शिक्षा अभियानासाठी शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना ४४ प्रकारची कामे करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले असून बीएलओच्या कामांसह समग्र शिक्षा अभियनाची कामे पूर्ण करायची असल्याने अभियानाच्या कामावर बहिष्कार टाकून सदर आदेश मागे घेण्याबाबत शिक्षकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आदेश मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) लोक प्रतिनिधींकडून अशा प्रकारची मागणी करण्यात आलेली आहे हे खरे आहे.

(४) व (५) समग्र शिक्षा अभियानाची माहिती शाळांनी भरणे आवश्यक आहे. त्यानुसार सरल प्रणालीमध्ये असलेली १४ बाबींची विद्यार्थीनिहाय माहिती स्टुडंट डेटाबेस मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टम (एसडीएमआयएस) मध्ये पोर्ट करण्यात आलेली असून उर्वरित ३० प्रकारची माहिती भरणे आवश्यक आहे.

-----------------

## दातिवरे (ता.जि.पालघर) गावातील पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईनचे नुतनीकरण करण्याबाबत

**(५४) * ४३८२७ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दातिवरे (ता.जि.पालघर) गावासह अन्य १७ गावांना केळवे झांजरोळी धरणातून पाणीपुरवठा करण्यात येत असून वाढत्या लोकसंख्येमुळे सदर गावात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्याची पाईपलाईन बदलून मोठी पाईपलाईन टाकण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालिन मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्याकडे दिनांक २१ जून, २०११ रोजी तसेच मंत्रालयीन पाणीपुरवठा विभागाने सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दिनांक ५ मार्च, २०१३ रोजी व कार्यकारी अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना दिनांक ११ मार्च, २०१३ रोजी व मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा यांनी प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांना दिनांक १७ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दातिवरे पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईनचे नुतनीकरण करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, वाढत्या लोकसंख्येमुळे व अस्तित्वातील प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजना कालबाह्य झालेली असल्यामुळे काही वेळेस अपुरा पाणीपुरवठा होतो.
(२) हे खरे आहे.
(३) दातिवरे गावातील पाणी पुरवठ्याच्या पाईपलाईनचे नुतनीकरण करण्याच्या मागणीच्या अनुषंगाने सदर योजना राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम २०१८-१९ च्या कृती आराखड्यात समाविष्ट करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांचे प्रलंबित वेतन अदा करण्याबाबत

**(५५) * ४२९१५ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटंजी (जि.यवतमाळ) तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांना शालार्थ प्रणालीच्या डेटाबेस सॉफ्टवेअरमध्ये तांत्रिक दोष निर्माण झाल्याचे कारण देवून माहे डिसेंबर, २०१६, जानेवारी-फेब्रुवारी, २०१७, ऑक्टोबर, २०१७ ते फेब्रुवारी, २०१८ अशा एकूण ८ महिन्यांचे वेतन मिळाले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, व तद्नुसार प्राथमिक शिक्षकांचे प्रलंबित वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) धरणातून दूषित पाणीपुरवठा होत असल्याबाबत

**(५६) * ४१५०५ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिखलोली (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) धरणातून अंबरनाथ शहराच्या पूर्व भागातील सुमारे ५० ते ६० हजार नागरिकांना गत काही दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत असल्याची बाब माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरिकांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाकडून सदरहू पाणी तपासणीसाठी पाठविण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त पाणी तपासणीचा अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व शासनास प्राप्त झाला आहे काय,

(४) असल्यास, सदर अहवालामध्ये तपासणी यंत्रणांनी काय नमूद केले आहे व त्यानुसार शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) व (४) होय, पाणी तपासणी अहवालानुसार चिखलोली धरणातील पाणी पिण्यास अयोग्य असल्यामुळे धरणातील पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. पर्यायी व्यवस्था म्हणून एम.आय.डी.सी.कडून पाणी उपलब्ध करुन घेऊन ग्राहकांना एक दिवस आड पाणीपुरवठा सुरु ठेवला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मोशी, पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरात अनेक हॉटेल चालक घरगुती सिलेंडरचा गैरवापर करीत असल्याबाबत

**(५७) * ४३७४० श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोशी, पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरात अनेक हॉटेल चालक व्यावसायिक सिलेंडरऐवजी घरगुती सिलेंडरचा गैरवापर करीत असल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नागरिकांच्या जिवितास धोका निर्माण करणाऱ्या बाबींकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वडपाले (ता.माणगाव, जि.रायगड) गावातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत

**(५८) * ४३६०६ श्री.जयंत पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३२४९० ला दिनांक १ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडपाले (ता.माणगाव, जि.रायगड) गावातील ग्रामस्थ अनेक वर्षापासून पाण्यासाठी इतरत्र वणवण करीत असून येथील महिलांना पाण्यासाठी ४ ते ५ किलोमीटर अंतरापर्यंत प्रवास करावा लागतो, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावामध्ये पिण्याचे पाणी पुरविणारी योजना आजतागायत पोहचली नसल्याने दोन वर्षात याच मार्गावरुन पाणी आणण्यास जाताना दोघांचा मृत्यू झाला असून सर्वाधिक पाऊस पडत असलेल्या कोकणातील काही गावांची देखील पाण्याच्या संकटातून सुटका झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर गावातील पाणीटंचाई दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे,

वडपाले गावाचा समावेश लोणेरे देवळी प्रादेशिक नळ पाणीपुरवठा योजनेमध्ये असून सद्य:स्थितीत एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे. उन्हाळ्यात योजनेची सिमेंटची पाईपलाईन वारंवार फुटते. सदर पाईपलाईन जमिनीखाली ७ ते ८ फूट खोल असल्याने तातडीने दुरुस्ती करणे शक्य होत नाही व पाणीपुरवठा वारंवार खंडीत होतो. त्यामुळे ग्रामस्थांना पुरेसे पाणी मिळत नाही. पर्यायाने ग्रामस्थांना १५०० मीटर अंतरावरील विहिरीवर पाणी आणण्यास जावे लागते.

गावात पाणी आणण्यास जाताना कुठल्याही ग्रामस्थांचा मृत्यू झाल्याबाबत तक्रार उपविभाग, माणगाव कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) ग्रामस्थांच्या मागणीनुसार वडपाले गावाचा समावेश सन २०१८-१९ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या वार्षिक आराखड्यात करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाई बाजार (जि.नांदेड) परिसरात बेकायदा गुटखा विक्री सुरु असल्याबाबत

**(५९) * ४३४५२ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाई बाजार (जि.नांदेड) सह परिसरात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे बेकायदा गुटखा विक्री सुरु असल्याचे दिनांक २१ मे, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून गुटखा सेवनामुळे कर्करोग सारख्या आजाराने ग्रासलेले रुग्ण आढळून आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार वाई बाजार येथील अवैध गुटखा विक्रीला नियंत्रण ठेवण्याबाबत कार्यवाही करुन गुटखा विक्रीकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश बापट :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

# शालेय विद्यार्थ्यांना राजीव गांधी अपघात विमा योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(६०) * ४३५२४ श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शालेय विद्यार्थ्यांना अपघात विम्याचा लाभ देण्यासाठी राज्य शासनाने १५ वर्षापूर्वी सुरु केलेल्या योजनेचा रायगडमध्ये अवलंब करण्यात येत नसल्याने मागील सात वर्षात रायगड जिल्ह्यामध्ये फक्त २९ विद्यार्थ्यांनाच अपघात विमा मिळाल्याचे माहे एप्रिल, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त राजीव गांधी विद्यार्थी अपघात योजनेबाबत गटशिक्षणाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या पालकांना माहिती देणे आवश्यक असताना ती माहिती पालकांना देण्यात येत नसल्याने विद्यार्थी योजनेपासून वंचित राहतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विमा योजनेची माहिती विद्यार्थ्यांच्या पालकांना देवून विद्यार्थ्यांना या योजनाचा लाभ देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) दिनांक १ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच गटशिक्षणाधिकारी यांचा दर मासिक सभेत आढावा घेण्यात येतो.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औंध (जि.पुणे) येथील स्पायसर विद्यापीठावर प्रशासक नेमण्याबाबत

**(६१) * ४३७९७ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंध (जि.पुणे) परिसरात स्पायसर विद्यापीठांच्या कुलगुरुंची पीएचडी प्रमाणपत्र बनावट असल्याचे माहे जून, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून या प्रकरणी लोकप्रतिनिधींनी मा.राज्यपाल यांना दिनांक १० जून, २०१८ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर निवेदनानुसार स्पायसर विद्यापीठावर प्रशासक नेमावा या मागणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मा.उदयनराजे भोसले, लोकसभा सदस्य यांनी दिनांक २०/०२/२०१८ रोजी मा.राज्यपाल यांना दिलेले निवेदन मा.राज्यपाल कार्यालयाकडून दिनांक १४/०३/२०१८ रोजी शासनास प्राप्त झाले. शासनाने सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करून अहवाल सादर करण्याबाबत दिनांक १९/०३/२०१८ रोजी संचालक, उच्च शिक्षण पुणे यांना कळविण्यात आले होते. संचालनालय उच्च शिक्षण कार्यालयातील, प्रशासन अधिकारी यांनी समक्ष स्पायसर विद्यापीठात जाऊन कुलगुरु श्री.नोबल प्रसाद पिल्लई, मुख्य वित्तीय अधिकारी श्री.रत्नास्वामी जयेम, कला शाखेचे प्रमुख श्री.चाको पॉल यांची पी.एच.डी. प्रमाणपत्राबाबतची तपासणी केली असता प्रमाणपत्रामध्ये काही त्रृटी आढळून आल्याने, या अध्यापकांनी पी.एच.डी. संदर्भात सादर केलेली प्रमाणपत्रे यांची वैधता मानव भारती विद्यापीठ सोलन हिमाचल प्रदेश व विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांच्याकडून तपासून घेण्याची आवश्यकता वाटते असे संचालकांनी अहवालात नमूद केले आहे, त्यानुषंगाने

पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच या प्रकरणात ॲलम कॅरी अलमेडीया यांनी चतु:श्रुगी पोलीस ठाणे, पुणे शहर येथे स्पायसर विद्यापीठातील वरील तीन अध्यापक व क्रिएटीव्ह एज्युकेशनल फाऊंडेशनचे संचालक श्री.गोपाल भिकाजी खंदारे यांच्याविरुध्द गुन्हा रजि.नंबर २०१७/२०१८ भा.दं.वि.क. ४१७, ४६५, ४६८, ४७१, ३४ नुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पुणे पोलीस करत आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माहीम गाव (ता.जि.पालघर) येथील पाणेरी नदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत**

**(६२) * ४३८५४ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहीम गाव (ता.जि.पालघर) येथील पाणेरी नदीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील दूषित पाणी सोडल्यामुळे नदीच्या प्रदूषणात वाढ झाल्याचे माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक बोअरवेल व विहिरींमध्ये हे प्रदूषित पाणी मिसळल्याने प्रदूषित पाण्यामुळे गावांतील नागरिकांना व परिसरातील अनेक भागांना आरोग्यविषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पाणेरी नदी प्रदूषण मुक्त करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाड औद्योगिक वसाहतीमधील सानिका केमिकल्स कारखान्यावर कारवाई करण्याबाबत

**(६३) * ४२६५५ श्री.प्रकाश गजभिये, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड औद्योगिक वसाहतीमधील सानिका केमिकल्समधून दिनांक ८ एप्रिल, २०१८ रोजी रात्रीच्या सुमारास विषारी वायू गळतीमुळे एका दुचाकीस्वार तरुणाला व अन्य नागरिकास इजा झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आले, तसेच या घटनेनंतर या परिसरातील नागरिकांनी कारखान्यावर निषेध मोर्चा काढला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुसार संबंधित कारखान्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) होय, विषारी वायू गळतीमुळे विषबाधा झाली हे खरे आहे. तथापि, दिनांक १८/०६/२०१८ रोजी प्राप्त झालेल्या अहवालावरून परिसरातील नागरिकांनी कारखान्यांवर कोणताही निषेध मोर्चा काढण्यात आल्याचे दिसून येत नाही.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाव्दारे दिनांक १८/०४/२०१८ रोजी कारखाना बंदचे आदेश बजाविण्यात आले होते. तथापि, दिनांक ०२/०५/२०१८ च्या पत्रान्वये या बंदीच्या आदेशास तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुदानास पात्र प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत

**(६४) * ४१६९७ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील : दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ६ मधील प्रश्न क्रमांक ३३४८९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक १ व २ जुलै, २०१६ रोजी अनुदानास पात्र झालेल्या शाळा व वर्ग तुकड्यांना अनुदान देण्याबाबत दिनांक ९ मे, २०१८ रोजी शासन आदेश निर्गमित केला आहे, तसेच सदर शाळा व वर्ग तुकड्यांवर कार्यरत असणाऱ्या शिक्षकांना वेतन अदा करण्याची मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर आदेशास अनुसरून शिक्षकांचे वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) दिनांक १ व २ जुलै, २०१६ अन्वये अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुरबाड (जि.ठाणे) येथील न्यु इंग्लिश स्कुलमधील शिक्षकांना थकित वेतन देण्याबाबत

**(६५) * ४३१२५ श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड (जि.ठाणे) येथील न्यु इंग्लिश स्कुलमधील २९ शिक्षकांना माहे सप्टेंबर, २०१७ पासून संस्थेने वेतन न दिल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आल्याचे दिनांक २३ एप्रिल, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शिक्षकांना थकित वेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच थकित वेतन किती कालावधीत देण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## स्वयंअर्थ सहाय्य शाळेतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याबाबत

**(६६) * ४२३७२ श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वयंअर्थ सहाय्य प्राथमिक/माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या मान्यता व स्टाफ फिक्सेशन शिक्षण विभागातर्फे विलंबाने देण्यात येते, तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना इयत्ता ८ वी ची एन.एम.एम.एस. परीक्षा देता येत नसून विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीही मिळत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी नागपूर विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १६ मे, २०१८ रोजी निवेदन पाठवून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजुर करुन शाळेतील समस्या सोडविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) अंशतः खरे आहे.
(२) सदर विषयाबाबतचे दिनांक ३० जानेवारी, २०१८ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(३) केंद्र शासनाने राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती योजना ही फक्त शासकीय/स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांकरीताच लागू केली असल्यामुळे स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील विद्यार्थ्यांना सदरची शिष्यवृत्ती देता येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती देण्याबाबत

**(६७) * ४१४३४ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत माहे मार्च, २०१८ अखेर मराठवाडा विभागातील जिल्हानिहाय नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या किती आहे व त्यानुसार नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५-१६ व २०१६-२०१७ या दोन वर्षात उपरोक्त योजनेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) मराठवाड्यातील जिल्हयांमध्ये सन २०१७-१८ करीता मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेंतर्गत नवीन व नुतनीकरणाच्या मिळून ३,००,२८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी २,१४,६१८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली असून त्यामधून २,१४,३४६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सन २०१५-१६ करीता नवीन व नुतनीकरणाच्या मिळून २,६७,६२६ विद्यार्थ्यांची नोंदणी केली होती. त्यापैकी १,८३,४८२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली असून त्यामधून १,६९,२७६ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण झालेले आहे.

तसेच, सन २०१६-१७ करीता नवीन व नुतनीकरणाच्या मिळून ३,७४,६३८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १,५७,६०७ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्यात आली असून त्यामधून १,४९,४०८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे वितरण झालेले आहे.

उर्वरित विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या विधी पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा नियमित होण्याबाबत

**(६८) * ४२८५६ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विद्यापीठाच्या सन २०१८ मधील विधी पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा प्रक्रिया नियमित कालावधीपेक्षा लांबणीवर टाकण्यात आली असून पदवी अभ्यासक्रमाच्या लांबलेल्या निकालांमुळे सन २०१८ च्या शैक्षणिक वर्षात अनेक विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणाची किंवा अन्य विद्यापीठांमध्ये प्रवेशाची संधी गमवावी लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विधी पदवी अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकात बदल करण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन वेळापत्रकातील बदल व विद्यार्थ्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मुंबई विद्यापीठाच्या सन २०१८ मधील विधी पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा प्रक्रिया नियमित कालावधीपेक्षा लांबणीवर टाकण्यात आल्याची बाब खरी आहे. तथापि, पदवी अभ्यासक्रमाच्या लांबलेल्या निकालांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाल्याची तक्रार विद्यार्थ्यांकडून विद्यापीठास प्राप्त झालेली नाही.

(२) पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे निकाल न लागल्यामुळे तसेच कंपनी सेक्रेटरी व लॉ या अभ्यासक्रमाच्या परीक्षा एकाचवेळी आल्यामुळे विद्यार्थ्यांकडून अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकात बदल करण्याबाबत अनेक निवेदने प्राप्त झाल्यामुळे सत्र I/III/V च्या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या. तसेच कोणत्याही विद्यार्थ्यांचे पुढील अभ्यासक्रमाचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून L.L.M. अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद जिल्हयातील ग्रंथालयांना दर्जावाढ देण्याबाबत

**(६९) * ४१७७४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात अ, ब, क व ड वर्गातील एकुण ५१९ ग्रंथालये असून सन २०११ मध्ये औरंगाबाद जिल्हयातील ११५ ग्रंथालयांनी दर्जा वाढ मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ ला संबंधित विभागाने ग्रंथालयाच्या तपासण्या केल्या, परंतु अद्यापपावेतो दर्जावाढ देण्याची कार्यवाही केली नसून दर्जा वाढ झाल्यास, ग्रंथालयांना वाढीव शासकिय अनुदान मिळून इमारत भाडे, ग्रंथखरेदी, स्टेशनरी, फर्नीचर इत्यादी खर्च भागविण्यास मदत होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर ग्रंथालयास दर्जावाढ देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

दिनांक ३१ मार्च, २०११ अखेर औरंगाबाद जिल्हयात ४१२ ग्रंथालये होती, तर दिनांक ३१ मार्च, २०१८ अखेर ४२० ग्रंथालये आहेत. सन २०१०-११ मध्ये दर्जा वाढीसाठी प्राप्त ६८ प्रस्तावापैकी ४४ ग्रंथालयांना दर्जोन्नती देण्यात आली. सन २०११-१२ मध्ये दर्जा वाढीसाठी प्राप्त ९० प्रस्तावापैकी ३५ ग्रंथालयांना दर्जोन्नती देण्यात आली.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील तलावांच्या संवर्धनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७०) * ४१७४० श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील तलाव संवर्धन प्रकल्पांतर्गत सन २०१७-१८ मध्ये १४ तलावांसाठी दिलेला निधी रत्नागिरी जिल्हयातील ११ तलावांच्या संवर्धनासाठी मंजूर केल्याची माहिती माहे मे, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील ३६ जिल्हयांपैकी फक्त रत्नागिरी या एकाच जिल्हयातील ११ तलावांसाठी निधी उपलब्ध करुन देण्यामागील कारणे व राज्यात मोठ्या प्रमाणात दुष्काळ परिस्थिती निर्माण होत असतानाही इतर जिल्हयातील तलावांच्या संवर्धनासाठी निधी उपलब्ध करुन न देण्यामागील कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने तलावांच्या संवर्धनासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर योजनेचा समावेश हा अविभाज्य योजनेच्या प्रकारात मोडत असल्याने निधीचे विभागनिहाय वाटप करणे अपेक्षित नाही. तथापि स्थानिक संस्थाकडून विहित नमुन्यातील प्रस्तावाबाबत निधीची मागणी आल्यास सुकाणू समितीच्या बैठकीतील निर्णयानुसार निधी वितरित करण्यात येतो. राज्यात आतापर्यंत विविध जिल्ह्यातील एकूण ५७ तलावांना मान्यता देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अजिंठा (जि.औरंगाबाद) येथील नेहरु मेमोरियल उर्दू हायस्कूलमध्ये गैरप्रकार झाल्याबाबत

**(७१) * ४३६११ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अजिंठा (जि.औरंगाबाद) येथील नेहरु मेमोरियल उर्दू हायस्कूलमध्ये बारावीच्या परिक्षेत शिक्षकांनी बसवलेल्या मुळ विद्यार्थ्यांच्या जागेवर बोगस विद्यार्थ्यांनी पेपर दिल्याचे दिनांक १ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी दुर्लक्ष करण्यासाठी महाविद्यालयाचे सीसीटीव्ही कॅमेरे परिक्षेच्या आधीपासून मुद्दाम बंद ठेवण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) नोंदणीकृत सात विद्यार्थ्यांवर राज्य मंडळ शिक्षासूचीनुसार जुलै, २०२० पर्यंत परीक्षेस बसण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, अजिंठा येथे गुन्हा नोंदविला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सहायक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७२) * ४२७२४ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास : तारांकित प्रश्न क्रमांक ४०८३६ ला दिनांक १६ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सहायक प्राध्यापकांच्या सुमारे १० हजार जागा रिक्त असून पात्रता धारकांची संख्या ५० हजारांवर गेल्याचे माहे मे, २०१८ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिनांक २३ मे, २०१७ रोजी सुधारीत आकृतिबंध आणि आर्थिक कारण देत सहाय्यक प्राध्यापक होण्यासाठी पात्र असणाऱ्या हजारो पीएचडी नेट-सेट धारकांची कोंडी झाल्याने अनेक पीएचडीधारक तासिका तत्वावर मासिक पाच ते सहा हजार इतक्या कमी वेतनावर काम करीत आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च समजली जाणारी पीएचडी ही पदवी घेऊन प्राध्यापक होण्यासाठी नेट-सेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांना कमी पगारात काम करावे लागते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सहाय्यक प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशतः खरे आहे.

अधिव्याख्यात्यांच्या रिक्त पदांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शैक्षणिक काम पूर्ण करण्यासाठी तासिका तत्वावरील अभ्यागत अधिव्याख्याता नियुक्तीची तरतुद आहे. त्यानुसार तासिका तत्वावर अधिव्याख्याता नियुक्ती करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याची काळजी घेण्यात येते.

(३) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दिनांक ५/११/२००८ च्या शासन निर्णयातील तरतुदीनूसार तासिका तत्वावरील अभ्यागत अधिव्याख्यात्यांना तासिका तत्वावर मानधन देण्यात येते.

(४) व (५) वित्त विभागाच्या प्रचलित धोरणानुसार पदांच्या आढाव्यास /आकृतिबंधास अंतिम मंजूरी मिळण्याच्या अनुषंगाने आवश्यक तो प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(७३) * ४२८७४ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.चंद्रकांत रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्चतम शैक्षणिक गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या महाविद्यालयांना वित्तीय स्वायत्तता देण्याच्या प्रस्तावाचा फेरविचार करण्याचे शासनाच्या विचाराधीन असून वित्तीय स्वायत्तता मिळणाऱ्या महाविद्यालयांना शैक्षणिक शुल्क आकारणी, शिक्षक व शिक्षकेतर पदे भरणे, परीक्षा घेणे इत्यादी अधिकार मिळणार आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे व सदर निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, महाविद्यालयांना वित्तीय स्वायत्ता दिल्यानंतर शासनाचे त्यावर नियंत्रण राहणार नसल्यामुळे सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण महागणार असून त्यांच्यावर उच्च शिक्षणापासून वंचित राहण्याची वेळ येण्याची शक्यता असल्यामुळे अशा विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी कोणता विचार करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रस्तावाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

महाविद्यालये व विद्यापीठांना स्वायत्ता देण्याबाबत राज्य शासनाने दिनांक २८ मे, २०१८ च्या शासन निर्णयान्वये केंद्र शासनाच्या मानव संसाधन मंत्रालयाची दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ ची अधिसूचना स्विकृत केली आहे. सदर अधिसूचनेन्वये महाविद्यालये व विद्यापीठांना स्वायत्ता प्रदान करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(७४) * ४२२८८ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.बाळाराम पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३८००३ ला दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने माहे नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर टप्याटप्याने १०० टक्के अनुदानास पात्र, अंशत: अनुदानित, विनाअनुदानित शाळेत कार्यरत शिक्षक व शिक्षकेतरांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी नियुक्त कर्मचारी पेन्शन संघर्ष समितीने शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली तसेच शिक्षकांच्या विविध संघटनांनी राज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे नोव्हेंबर, २००५ पूर्वी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळेत सेवा करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी भविष्य निर्वाह निधी योजना लागू करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी मा.उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ व नागपूर खंडपीठ या ठिकाणी याचिका दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या विनाअनुदान शाळा, वर्ग तुकड्या तसेच अंशत: अनुदानित शाळा व वर्ग तुकड्यावरील कार्यरत शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने अंतरिम आदेश देऊन सदर याचिकाकर्त्यांना जुन्या भविष्य निर्वाह निधीचे सर्व लाभ देण्याबाबत आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, माहे नोव्हेंबर, २००५ नंतर शासकीय सेवेत रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी शासनाने जुनी पेन्शन योजना रद्द करुन नविन डीसीपीएस योजना लागू केली, परंतु ती योजना रद्द करुन जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांनी शासनाच्या विरोधात आंदोलने, उपोषणे केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त मागणीची व आंदोलनाची दखल घेऊन दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या विनाअनुदान शाळा, वर्ग तुकड्या तसेच अनुदानित शाळा व वर्ग तुकड्यावरील कार्यरत शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनोद तावडे :** (१) ते (५) होय, हे खरे आहे. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयासमोर एकत्रित सुनावणी झाली असून सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. अंतिम निर्णय झालेला नाही.

-----------------

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कर्मचाऱ्यांना कुटूंब निवृत्तीवेतन देण्याबाबत

**(७५) * ४३८३३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या सन २००५ पर्यंत सेवेत रुजू झालेल्या राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना कुटूंब निवृत्तीवेतन देण्यात येते, परंतु शासनाच्या पर्यावरण विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामध्ये सन २००५ पर्यंत सेवेत रुजु झालेल्या कर्मचाऱ्यांना कुटूंब निवृत्तीवेतन देण्यात येत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २००५ पर्यंत सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना कुटूंब निवृत्तीवेतन देण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १५० कोटी रुपयांची तरतूद केली असूनही, संबंधित कर्मचाऱ्यांना कुटूंब निवृत्तीवेतन न देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कर्मचाऱ्यांना कुटूंब निवृत्तीवेतन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील २००५ पर्यंत सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना कुटूंब निवृत्तीवेतन देण्याचा प्रस्ताव याबाबतचा कोणताही भार शासनावर येणार नाही या तपशीलासह वित्त विभागास सादर

करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्ताव वित्त विभागाने अमान्य केला होता. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील २००५ पर्यंत सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना कुटूंब निवृत्तीवेतन देण्याचा सुधारीत प्रस्ताव याबाबतचा कोणताही भार शासनावर येणार नाही या तपशीलासह वित्त विभागास पुन्हा सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राजपुरी (ता.मुरुड, जि.रायगड) गावासाठी पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(७६) * ४३१४९ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजपुरी (ता.मुरुड, जि.रायगड) ग्रामपंचायतीसाठी पाण्याची टंचाई भासू नये म्हणून रायगड जिल्हा परिषदेमार्फत राजपुरी, माझेरी, डोंगरी आदी ३ गावांसाठी ३ कोटी ३५ लाख रुपयांची पाण्याची योजना राबविण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजना पूर्ण होऊन एक वर्षापेक्षा अधिक कालावधी लोटला तरी उक्त गावांना पिण्याचे पाणी उपलब्ध न झाल्याने गावातील लोकांना पाण्यासाठी इतरत्र भटकावे लागत आहे तसेच येथील विहिरी कोरड्या पडल्या असल्याने गावातील महिलांना गावाच्या बाहेर मुरुडला येऊन बैलगाडीतून पाणी वाहून न्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच उक्त गावांसाठी २ कोटीहून अधिक खर्च करुन पाणीपुरवठा योजना लागू करुनही सदर गावांना एक थेंबही पाणी मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राजपुरी येथील पाणीटंचाई दूर करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बबनराव लोणीकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही.

राजपुरी पाणीपुरवठा योजनेमधील समाविष्ठ राजपुरी मोहल्ला, राजपुरी कोळीवाडा, माझेरी डोंगरी, आदिवासीवाडी या गावांना स्वतंत्र पाण्याच्या साठवण टाक्या बांधून पाणीपुरवठा सुरु केलेला आहे. वीज मंडळाकडील अनियमित वीज पुरवठ्यामुळे काही कालावधीसाठी या गावांना अपुरा पाणीपुरवठा होत होता. दरम्यानच्या कालावधीत वीज मंडळाकडून पुरेशा दाबाने वीज पुरवठा झाल्याने सर्व गावांना नियमितपणे पाणीपुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. ग्रामीण पाणीपुरवठा व स्वच्छता समितीकडून सदर योजना दिनांक १६/०४/२०१८ पासून ग्रामपंचायतीकडे हस्तांतरीत केलेली आहे. सद्य:स्थितीत ग्रामपंचायतीकडून सुरळीत पाणीपुरवठा सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सोमेश्वरनगर (ता.बारामती, जि.पुणे) येथील नीरा नदीपात्रातील प्रदूषण रोखण्याबाबत

**(७७) * ४३७४३ श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोमेश्वरनगर (ता.बारामती, जि.पुणे) येथील नीरा नदीपात्रात सोमेश्वर व मालेगांव सहकारी साखर कारखाना व खाजगी कंपन्यांकडून रसायनमिश्रित पाणी सोडले जात असल्याने नीरा नदीचे पाणी दूषित होत असल्याचे माहे एप्रिल, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार नीरा नदीचे प्रदूषण रोखण्याबाबत कार्यवाही करुन रसायनमिश्रित पाणी नदीपात्रात सोडणाऱ्या साखर कारखाने व खाजगी कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रामदास कदम :** (१) हे खरे आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने पाहणी केली असता मे.माळेगाव सहकारी साखर कारखाना लि. या उद्योगाला दिनांक ०५/०१/२०१८ रोजी प्रस्तावित आदेश व दिनांक २५/०५/२०१८ रोजी अंतरिम निर्देश देऊन रक्कम रुपये १ लाखाची बँक हमी दंडात्मक स्वरुपात जप्त केली आहे. तसेच मे.श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि. उद्योगाला दिनांक १५/०१/२०१८ रोजी समजपत्र देण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत दोन्ही कारखाने बंद अवस्थेत असून त्यांचे कुठल्याही प्रकारचे सांडपाणी नदीमध्ये मिसळत नाही. तसेच तक्रारीमध्ये नमूद इतर उद्योगातुन नदीमध्ये सांडपाणी जात नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.